१०३ शतकोत्तर वाटचाल
R.N.I.No.1814/57
एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
• मुंबई, मंगळवार १९ ऑगस्ट, २०२५ • वर्ष-१०३, अंक-१६६, पाने-८, किंमत : ₹ ५ NAVAKAL
• Vol.- 103, Issue - 166, Marathi - Daily - Mumbai, 19 August, 2025 Page- 8 Price- Rs. 5/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email-navakal.1923@gmail.com

## आज (मंगळवार) हवामान

» मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक - रेड अलर्ट
» रत्नागिरी, सिंधुदुर्ग - ऑरेंज अलर्ट
» मुंबई आणि ठाण्यातील शाळांना मंगळवारी सुट्टी

# राज्यात पावसाचा धुमाकूळ! ६ जणांचा मृत्यू
## मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी ४८ तास रेड अलर्ट

**राज्यात दोन दिवसांपासून मुसळधार पावसाने धुमाकूळ घातला आहे. हवामान विभागाने मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरीला ४८ तासांचा रेड अलर्ट जारी केला आहे. मुंबई-ठाण्यात उद्या शाळा, महाविद्यालये बंद ठेवली आहेत. याशिवाय मराठवाडा, विदर्भ, खानदेशासह पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. मराठवाड्यात नांदेड, हिंगोली जिल्ह्यात ढगफुटी सदृश पावसामुळे आज ६ जणांचा मृत्यू झाला.**



■ मुंबई

**मुख्यमंत्री** देवेंद्र फडणवीस, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी मुंबईतील आपत्ती व्यवस्थापन केंद्रातून परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी व्हिडिओद्वारे सर्व जिल्ह्यांच्या प्रमुख अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उपाययोजनांवर चर्चा केली. मात्र आज उबाठा नेते उध्दव ठाकरे, आदित्य ठाकरे व मनसे नेते राज ठाकरे कुठेच दिसले नाहीत.

मुंबईसह उपनगरांमध्ये काल रात्रीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये कमरेपर्यंत पाणी साचले. नालासोपारा स्थानकासमोरचा रस्ता, वडाळा रेल्वे स्थानक परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. दादर, किंग्ज सर्कल परिसरात शाळेची बस पाण्यात अडकली. अंधेरी सबवे, चुनाभट्टी, मिठी नदी परिसर, मलबार हिल, » पान ७ वर



**गणपती बाप्पा मोरयाऽऽ चा जयघोष करत गणेशभक्तांनी धोबीतलावच्या महाराजाची आगमन मिरवणूक काढली.**

## कुणाल कामराविरोधात हक्कभंग महाधिवक्त्यांचा सल्ला मागितला

■ मुंबई

विनोदी व तिरकस बोलत अनेक विषयांवर टिप्पणी करणाऱ्या कुणाल कामरा विरोधात महाराष्ट्र विधिमंडळाने दाखल केलेल्या हक्कभंग ठरावावर आता राज्याच्या महाधिवक्त्यांचा सल्ला मागण्यात आला आहे. कुणाल कामरा याने हक्कभंग नोटीसला दिलेल्या उत्तरानंतर त्याच्यावरील पुढील कारवाईसाठी हक्कभंग समितीने राज्याचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांना कायदेशीर सल्ला देण्याची विनंती केली आहे. कुणाल कामराने हक्कभंग नोटीसला दिलेल्या उत्तरात म्हटले होते की, ही नोटीस जाणीवपूर्वक व चुकीच्या हेतूने देण्यात आलेली आहे. हक्कभंग समितीच्या बैठकीत कुणाल कामराचे हे उत्तर विचारात घेण्यात आले. त्यानंतर त्याच्यावर पुढील कारवाई करण्याआधी किंवा त्याला पुन्हा नोटीस देण्याआधी कायदेशीर सल्ला मागण्याचा निर्णय घेण्यात आला. कामराने म्हटले होते की, त्याच्या एकनाथ शिंदेंवरील टिप्पणीने विधिमंडळाच्या कामात अडथळा येत नसून त्याद्वारे इतर सदस्यांचा किंवा विधिमंडळाचाही अपमान होत नाही. आपल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही उल्लेख त्याने या उत्तरात केला होता. जून महिन्यात विधानपरिषद अध्यक्षांनी कुणाल कामरा विरोधात हक्कभंग ठराव दाखल करून घेत तो समितीकडे पाठवला होता. कुणाल कामराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर ठाणे की रिक्षा या उपहासात्मक गीताने टिप्पणी केली होती.

## ९० व्या वर्षीही काम करायचे का? अण्णा हजारे संतापले

■ पुणे

**ज्येष्ठ** समाजसेवक अण्णा हजारे यांचा फोटो असलेला एक बॅनर पाषाण परिसरात लावण्यात आला आहे. यावर आता तरी उठा अण्णा, मतांची चोरी झाली आहे, असा मजकूर लिहिलेला आहे. अण्णांना याद्वारे आंदोलन करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र या बॅनरवरून अण्णा हजारे संतापले आहेत. वयाच्या ९० व्या वर्षीही काम करावे का? असा प्रतिप्रश्न अण्णांनी केला आहे.

अण्णा म्हणाले की, आतापर्यंत मी भरपूर काम केले आहे. भ्रष्टाचार होऊ नये यासाठी आंदोलने केली आहेत. माझ्यामुळे या देशात दहा कायदे झाले. माहितीच्या अधिकाराचा कायदा माझ्यामुळे मिळाला. देशात मोठ्या प्रमाणात जागृती झाली. माहितीचा अधिकार, दप्तर दिरंगाई, बदलीचा कायदा, लोकपाल, लोकायुक्त असे कायदे माझ्या प्रयत्नांमुळे अस्तित्वात आले आहेत. आता माझे वय झाले आहे. मी ९० वर्षांचा झाल्यानंतरही काम करायचे आणि तुम्ही झोपून राहायचे का ? कोणी ही अपेक्षा करत असेल तर ते चुकीचे आहे.

## शिवभोजन थाळी संकटात केंद्राचे अनुदान थकले

**केंद्रचालक आंदोलनाच्या पावित्र्यात**

■ मुंबई

**राज्यातील** शिवभोजन थाळी योजनेवर आर्थिक संकट कोसळले आहे. केंद्र चालकांची तब्बल सात महिन्यांची बिले सरकारकडे थकीत असून ते आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.


फेब्रुवारी २०२५ नंतर केंद्र चालकांना एकाही महिन्याचे पैसे मिळालेले नाहीत. राज्यात सध्या १,८८४ शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत. पूर्वी ही संख्या सुमारे २,५०० होती. मात्र अनुदान वेळेत न मिळाल्यामुळे




अनेक केंद्र बंद पडली आहेत. शिवभोजन थाळीची किंमत ५० रुपये आहे. त्यापैकी १० रुपये लाभार्थ्यांकडून घेतले जातात, तर उर्वरित ४० रुपये सरकारकडून अनुदान स्वरूपात मिळतात. हेच अनुदान गेल्या सात महिन्यांपासून थकले आहे. त्यामुळे केंद्रचालकांना भाडे, विजबिल, किराणा तसेच कर्मचाऱ्यांचा पगार देणे अशक्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवभोजन केंद्र चालकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांची भेट घेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. मात्र, भेट मिळत नसल्यामुळे त्यांचा रोष अधिकच वाढला आहे. शासनाने तातडीने दखल न घेतल्यास शिवभोजन केंद्र बंद ठेवण्याचा इशारा केंद्रचालकांनी दिला आहे.

## अलास्काच्या बैठकीनंतर पुतीन यांचे मलमूत्रही नेले

■ अलास्का



**रशियाचे** राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याबरोबर गेल्या आठवड्यात अमेरिकेत अलास्का येथे झालेल्या बैठकीनंतर पुतीन यांचे मलमूत्रही पुन्हा रशियाला नेण्यात आले आहे. राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षेसाठी हा प्रकार करण्यात आला असून त्यांच्या तब्येतीबाबत कोणत्याही देशाला निश्चित माहिती मिळू नये म्हणून ही दक्षता घेण्यात आली. पुतीन हे ७२ वर्ष वयाचे असून ते शारीरिक दृष्ट्या सुदृढ असल्याचा दावा नेहमी करण्यात येतो. त्या उलट त्यांच्या आजारपणाच्याही चर्चा असतात. त्यांच्या प्रकृतीची नेमकी माहिती इतर राष्ट्रांच्या गुप्तहेरांना लागू नये म्हणून त्यांचे मलमूत्रही रशियातच नेले गेले. तिथेच त्याची विल्हेवाट लावली जाणार आहे. अलास्कामधून निघत असताना त्यांच्या एका अंगरक्षकाकडे त्यासाठी असलेली वेगळी बॅग आढळली.

## संतोष देशमुख हत्या प्रकरण ३० ऑगस्टला पुढील सुनावणी

■ बीड

**बीड** जिल्ह्यातील मस्साजोगमध्ये सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी आज बीडच्या मकोका कोर्टात पार पडली. तीन तास झालेल्या या सुनावणीत आरोपी वाल्मिक कराडच्या वकिलांनी पावणेदोन तास जोरदार युक्तिवाद केला. त्यानंतर न्यायालयाने कोणताही निर्णय न देता तो राखून ठेवला असून, या प्रकरणी पुढील सुनावणी ३० ऑगस्ट रोजी होणार आहे.

विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी कराडच्या जामीन अर्जाला विरोध केला आहे. कराडसह या खटल्यातील इतर आरोपींना दोषमुक्त करण्याच्या मागणीवरही त्यांनी आक्षेप घेतला आहे. त्यामुळे आज आरोपींना जामीन मिळतो का, तसेच त्यांना दोषमुक्त केले जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु न्यायालयाने पुढील सुनावणीची ३० ऑगस्ट ही तारीख दिली आहे.

कराडच्या अटकेच्या वेळी त्याला अटकेची कारणे सांगण्यात आली नव्हती, असा युक्तिवाद त्यांच्या वकिलांनी केला. मात्र, निकम यांनी तो खोडून काढला. आवादा कंपनीचे कर्मचारी सुनील शिंदे यांनी रेकॉर्ड केलेल्या फोन कॉलची तारीख चुकीची असल्याचा आरोपींचा दावाही निकम यांनी कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) सादर करून फेटाळला. विष्णू चाटेच्या वकिलांनी त्याच्यावर कोणताही गुन्हा नसल्याचा दावा केला.

## केदारनाथमध्ये दरड कोसळून जालनाच्या भाविकाचा मृत्यू

■ केदारनाथ

**केदारनाथ** यात्रेदरम्यान दरड कोसळून महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील वडगाव येथील परमेश्वर खवल (३८) यांचा मृत्यू झाला. गौरीकुंड येथून पायी जात असताना दरड अंगावर पडल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या परमेश्वर खवल यांच्या पश्चात वृद्ध आई-वडील, पत्नी, दोन मुली व एक मुलगा असा परिवार आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.



## बारामतीत रयत शिक्षण संस्थेमध्ये अश्लील नृत्य

■ बारामती

**रयत** शिक्षण संस्थेच्या बारामती तालुक्यातील मोरगाव येथील मयुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या मनोरंजनाच्या कार्यक्रमात अश्लील नृत्य झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.

व्हिडिओमध्ये एक महिला पाव्हण नाद करायचा नाय, या गाण्यावर नाचताना अश्लील हावभाव करताना दिसत आहे. हा व्हिडिओ दहीहंडी उत्सवाचा असल्याचे सोशल मीडियावरून सांगितले जात असले तरी, प्रत्यक्षात तो मे महिन्यात गावातील भैरवनाथ यात्रेनिमित्त आयोजित कार्यक्रमाचा असल्याची माहिती आहे. यावर सोशल मीडियावर

**व्हिडिओ व्हायरल**

तीव्र टीका होत असून, विरोधकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. रयत शिक्षण संस्था ही राज्यातील एक नामांकित संस्था असून तिचा कारभार जेष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार पाहतात. राज्यातील अनेक शाळा या संस्थेकडून चालवल्या जातात.

## आसाममधील सिमेंट कंपनीला तब्बल अर्ध्या जिल्ह्याइतकी जमीन

■ गुवाहाटी

**आसाममधील** एका सिमेंट कंपनीला तब्बल ३००० बिघा (अंदाजे २ हजार एकर) आदिवासी जमीन दिल्याबद्दल गुवाहाटी उच्च न्यायालयाने आश्चर्य व्यक्त करत कठोर ताशेरे ओढले आहेत. या प्रकरणाच्या सुनावणीत न्यायालयाने म्हटले की, ही कंपनी फारच प्रभावी असावी. कारण त्यांना जवळ जवळ अर्धा जिल्हा जमीन देण्यात आली आहे.

आसाममधील दिमा हसाओ या जिल्ह्यातील उमरांगसो गावातील ही जमीन असून, त्याबद्दल सोनेश होजाई व इतर २१ जणांनी आसाम सरकारविरोधात याचिका दाखल




केली होती. आसाम सरकारने महाबल सिमेंट या कंपनीला दिलेल्या या जमिनीवर आक्षेप घेण्यात आला असून, ही जमीन पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वाची असून, त्यावर आदिवासींचा पहिला हक्क असल्याचे याचिकाकर्त्यांनी म्हटले आहे.

सुनावणी दरम्यान गुवाहाटी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार मेढी यांनी कडक शब्दांत सरकारची कानउघाडणी केली. त्यांनी म्हटले की, ही कंपनी सरकारदरबारी फारच प्रभावशाली असावी. सरकारने तिला जवळजवळ अर्धा जिल्हा भेट दिला आहे. हा कोणत्या प्रकारचा निर्णय आहे? ही थट्टा आहे का? तुम्ही इतकी जमीन एखाद्या कंपनीला कशी काय देऊ » पान ७ वर

## एमटीएनएलची थकबाकी ८६५९ कोटींवर पोहोचली

■ नवी दिल्ली

**केंद्र** सरकारच्या मालकीच्या महानगर टेलिफोन निगम लिमिटेड या दूरध्वनी सेवा पुरवणाऱ्या कंपनीच्या बँक कर्जाची थकबाकी ८,६५९ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. कंपनीवर एकूण ३४ हजार ५७७ कोटी रुपयांचे कर्ज असून, त्यांच्या शेअर्सचे भावही कोसळले आहेत.

महानगर टेलिफोन निगम कंपनीने मुंबई शेअर बाजाराला दिलेल्या माहितीत हा तपशील देण्यात आला आहे. यानुसार बँकांचे थकित कर्ज ८,६५९ कोटींवर गेले आहे. यात युनियन बँक, इंडियन ओव्हरसीज बँक, बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँकेसह एकूण सात बँकांच्या कर्जाचा समावेश आहे. एमटीएनएलवर जुलै अखेरपर्यंत एकूण ३४,५७७ कोटींचे कर्ज असून, त्यात बँक कर्ज ८,६५९ कोटी, सार्वभौम गॅरंटीड बाँड २४,०७१ कोटी व दूरसंचार विभागाकडून घेतलेल्या १,९२१ कोटी रुपयांचा समावेश आहे. कंपनीच्या या आर्थिक स्थितीमुळे एमटीएनएल कंपनीच्या समभागांची किंमतही १४ टक्क्यांनी घसरली आहे.

## निवडणूक आयोग जबाबदारी टाळत आहे! 'इंडिया'चा हल्लाबोल

■ नवी दिल्ली

**काँग्रेस** खासदार राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर मतचोरीचा आरोप केल्यानंतर त्याला उत्तर देण्यासाठी आयोगाने घेतलेल्या पत्रकार परिषदेवर इंडिया आघाडीने आज पुन्हा हल्लाबोल केला. निवडणूक आयोग आपल्या जबाबदारीपासून पळ काढत असल्याचे काँग्रेस नेते गौरव गोगोई यांनी म्हटले आहे.

निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेनंतर आज इंडिया आघाडीने पत्रकार परिषद घेत आयोगाच्या परिषदेतील मुद्यांचा समाचार घेतला. गौरव गोगोई म्हणाले की, मशीन रिडेबलमुळे गोपनीयतेचा भंग कसा होतो, हे काल त्यांनी सांगितले नाही. ६५ लाख मतदारांची यादी सर्वोच्च न्यायालयात द्यायला ते का विरोध करत होते? आधार कार्ड हा पुरावा नाही असे त्यांनी का म्हटले? या प्रश्नांची निश्चित उत्तरे त्यांनी दिली नाहीत. काही अधिकारी हे निष्पक्ष राहिलेले नसून, ते एका पक्षाची बाजू घेत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. महाराष्ट्रात मतदार यादीत नावे वाढवण्यात आली. कर्नाटकात मतदार यादीत अनेक विसंगती आहेत. त्या कोणत्याही प्रश्नांची आयोगाने उत्तरे दिली नाहीत.

समाजवादी पार्टीचे खासदार रामगोपाल यादव यांनी म्हटले की, आयोग वारंवार प्रतिज्ञापत्रे मागतो. २०२२ मधील उत्तर प्रदेश निवडणुकीतून १८ हजार मतदारांची नावे काढून टाकली. त्याची तक्रार करून आम्ही प्रतिज्ञापत्रे दिली. त्यावर आतापर्यंत काहीही कारवाई झाली नाही. » पान ७ वर





लालबाग परळमध्ये गणेशभक्तांनी वाजत गाजत आपल्या लाडक्या बाप्पाची भव्य मिरवणूक काढली.

# २० ऑगस्टनंतर सूर्यदर्शन! पंजाब डख यांचा अंदाज

■ मुंबई

**राज्यात** २० ऑगस्टनंतर सूर्यदर्शन होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी पुढील काही दिवस अतिशय महत्त्वाचे असल्याचा अंदाज हवामान निरीक्षक पंजाब डख यांनी वर्तवला आहे.

पंजाब डख यांनी सांगितले की, १७ ऑगस्टच्या रात्रीपासून ते २० ऑगस्टपर्यंत राज्यात अनेक भागांत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस कोसळण्याची शक्यता आहे. या पावसाचा जोर विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पुणे, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र या भागांमध्ये जास्त जाणवणार आहे. पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, भंडारा, गोंदिया जिल्ह्यांत १८ ते २० ऑगस्टदरम्यान जोरदार पावसाची शक्यता आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती, अचलपूर, परतवाडा, दर्यापूर या भागांतही पावसाचा जोर वाढणार आहे. मराठवाड्यातील लातूर, बीड, धाराशिव, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड या जिल्ह्यांत पावसाचा प्रभाव अधिक राहील. काही ठिकाणी कमी वेळात अधिक पावसामुळे पूरस्थिती उद्भवू शकते. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक या भागांतही



२१ ऑगस्टपर्यंत चांगला पाऊस पडणार आहे. त्यामुळे नदी-नाल्यांत पाणीपातळी वाढण्याची शक्यता आहे. पुणे, मुंबई, कोकण आणि नाशिक या भागांमध्ये १८ ते २१ ऑगस्टदरम्यान अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. इगतपुरी, जुन्नर, संगमनेर, अहमदनगर, कळसूबाई परिसर आणि कोकणातील जिल्ह्यांमध्येही पावसाचा जोर वाढेल .२१ ऑगस्टनंतर राज्यात पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता आहे. २१ ते २५ ऑगस्टदरम्यान हवामान कोरडे राहील, सूर्यदर्शन होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्या कालावधीत शेतीची कामे, फवारण्या, खत टाकणे व मशागत पूर्ण करून घ्यावी. पाणी साचलेल्या भागात पिकांवर फवारणी करावी. कारण पावसानंतर बुरशी व किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. विशेषतः कापूस व ऊस पीक धारकांनी योग्य नियोजन करून खत व औषध फवारणी करून घ्यावी.

## परदेशी गुंतवणूक घटली! २१ हजार कोटींची विक्री

■ नवी दिल्ली

**जागतिक** अनिश्चितता, अमेरिका-भारत व्यापार तणाव, कमकुवत होत चाललेला रुपया आणि पहिल्या तिमाहीतील अपेक्षेपेक्षा कमी कॉर्पोरेट नफ्याच्या पार्श्वभूमीवर, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात भारतीय शेअर बाजारातून २० हजार ९७५ कोटी रुपयांची विक्री केली. डिपॉझिटरीकडील आकडेवारीनुसार हा १४ ऑगस्टपर्यंतचा आकडा आहे. यामुळे २०२५ मध्ये आतापर्यंत एफपीआयची एकूण निव्वळ विक्री १.१६ लाख कोटी रुपयांवर पोहोचली



आहे.

यापूर्वी जुलै महिन्यात एफपीआयने १७ हजार ७४१ कोटी रुपयांची विक्री केली होती. मात्र त्यापूर्वी मार्च ते जून दरम्यान त्यांनी ३८ हजार ६७३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. मॉर्निंगस्टार इन्व्हेस्टमेंट रिसर्च इंडियाचे हिमांशू श्रीवास्तव म्हणाले की, जागतिक पातळीवरील भू-राजकीय तणाव, विशेषतः अमेरिकेतील व्याजदरविषयी असलेली अनिश्चितता, गुंतवणूकदारांच्या जोखीम टाळण्याच्या वृत्तीला कारणीभूत आहे. एंजल वनचे वरिष्ठ विश्लेषक वकार जावेद खान यांनी सांगितले की, भारतावर प्रस्तावित २५ टक्के दुय्यम टॅरिफ २७ ऑगस्टनंतर लागू होण्याची शक्यता नसल्याचे संकेत आहेत. त्यामुळे बाजारासाठी हा एक सकारात्मक संकेत मानला जात आहे. एस अँड पी यांनी भारताचे क्रेडिट रेटिंग बीबीबीवर स्थिर ठेवल्यामुळे एफपीआयच्या भावांमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे.

देश विदेश

## रशियामध्ये व्हॉट्सअ‍ॅप आणि टेलिग्रामच्या कॉलिंगवर बंदी

■ मोस्को

**रशियन** सरकारने जगप्रसिद्ध व्हॉट्सअ‍ॅप आणि टेलिग्रामच्या कॉलिंगवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. फसवणूक करण्यासाठी, दहशतवादी कारवायासाठी आणि रशियन नागरिकांची दिशाभूल करण्यासाठी टेलिग्राम आणि व्हॉट्सअ‍ॅपच्या कॉलिंगचा वापर केला जात आहे. त्यामुळे यावर बंदी घातली जात असल्याचे रशियन सरकारकडून सांगण्यात आले. लॉ इनफोर्समेंट एजन्सी आणि सर्वसामान्य नागरिकांकडून सातत्याने यासंबंधी तक्रारी मिळत होत्या. या दोन्ही कंपन्यांनी संबंधितांवर कडक कारवाई करावी, असे सांगूनही दुर्लक्ष केल्याने हा निर्णय घेतला आहे.

## हॉलिवूड सुपरमॅन फेम टेरेंस स्टॅम्प यांचे निधन

■ लंडन

**हॉलिवूडमधील** हिट चित्रपट 'सुपरमॅन' आणि 'सुपरमॅन २' मध्ये खलनायक जनरल झोडची भूमिका साकारणारे टेरेंस स्टॅम्प यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाल्याने एकच हळहळ व्यक्त होत आहे. १९६० च्या दशकात त्यांनी लंडनमध्ये अभिनेता म्हणून नाव कमावले. त्यांनी आपल्या कारकिर्दीत खलनायकापासून ते विनोदीपर्यंत विविध भूमिका साकारून लोकांची मने जिंकली. २२ जुलै १९३८ रोजी पूर्व लंडनमधील एका कामगार कुटुंबात जन्मलेले टेरेंस स्टॅम्प हे थॉमस स्टॅम्प यांचे पुत्र होते. त्यांनी शाळा सोडल्यानंतर जाहिरातींत काम केले. त्यासोबत काही नाटकात काम केले. त्यानंतर ते अभिनयाकडे वळले.

## काश्मीरमधील भूस्खलनामुळे वैष्णोदेवी यात्रा थांबवली

■ श्रीनगर

**जम्मू-काश्मीरमधील** किश्तवाड व कठुआ जिल्ह्यांमध्ये झालेल्या ढगफुटी व भूस्खलनाच्या भीषण घटनांमुळे वैष्णोदेवीची यात्रा तत्काळ थांबवली आहे. कटरा येथून सुरू होणारी यात्रा पूर्णपणे बंद करून भाविकांना परत जाण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. या निर्णयामुळे यात्रेसाठी दररोज मिळणाऱ्या ट्रॅव्हल स्लिपचे वितरण थांबवून संबंधित काउंटर बंद केले आहेत. कटरा परिसरात कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून बाजारपेठांमध्ये भाविकांना फिरण्यास बंदी घातली आहे. जे भाविक आधीच यात्रेसाठी मार्गस्थ झाले आहेत त्यांना शक्य तितक्या लवकर कटरा येथे परतण्याच्या सूचना दिल्या आहेत. सुरक्षिततेच्या दृष्टीने लाऊडस्पीकरद्वारे सातत्याने सूचना दिल्या जात आहेत. स्थानिक प्रशासन आणि सुरक्षा यंत्रणा पूर्ण सज्ज आहेत. हवामान विभागाने पुढील काही दिवसांमध्ये जोरदार पावसाचा इशारा दिल्याने भाविकांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## बंगळुरूमध्ये फॉक्सकॉनकडून आयफोन १७ चे उत्पादन सुरू

■ बंगळुरू

**तैवानी** इलेक्ट्रॉनिक्स कंपनी फॉक्सकॉनच्या बंगळुरू येथील देवनहल्ली कारखान्यात आयफोन १७ चे उत्पादन छोट्या प्रमाणात सुरू झाले आहे. चीनबाहेरील फॉक्सकॉनचे हे दुसरे सर्वात मोठे युनिट असून तब्बल २.८ अब्ज अमेरिकन डॉलर (सुमारे २५,००० कोटी रुपये) गुंतवणुकीतून ही सुविधा उभारण्यात आली आहे.

अलिकडेच चीनने भारतात काम करणारे ३०० हून अधिक अभियंते व तंत्रज्ञ परत बोलावले होते. त्यामुळे उत्पादन प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले. चिनी अभियंते फॉक्सकॉनच्या हाय-टेक असेंब्ली लाईन्स, फॅक्टरी डिझाईन तसेच भारतीय कामगारांना प्रशिक्षण देण्याचे काम पाहत होते. उत्पादनात अडथळा येऊ नये म्हणून भारत सरकारने त्यांना व्हिसा सुविधा उपलब्ध करून दिली होती.

## खैबर पख्तूनख्वाच्या कोहटमध्ये ७ जणांची गोळ्या घालून हत्या

■ पेशावर

**खैबर** पख्तूनख्वाच्या कोहट येथील रायगी शेनो खेल भागात रात्री सहलीवरून परतत असताना वैमनस्यातून दोन कुटुंबातील ७ जणांची गोळ्या घालून हत्या झाली. त्यामुळे पाकिस्तानात एकच खळबळ उडाली.

याप्रकरणी पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, अद्याप कोणालाही अटक केली नसल्यामुळे मृतांचे नातेवाईक आक्रमक झाले. नातेवाईकांनी मृतदेह रोडवर ठेवून जोरदार निषेध केला. गुन्हेगारांना लवकरात लवकर अटक केली जाईल, असे आश्वासन पोलिसांनी दिल्याने नातेवाईकांनी माघार घेतली. जिल्हा पोलीस अधिकारी कोहट जाहिदुल्ला खान म्हणाले की, ते तांडा धरणावरून त्यांच्या मूळ गावी परतत असताना त्यांच्यावर हल्लेखोरांनी गोळीबार केला. ही घटना रात्री १२.४५ वाजता



घडली. आम्ही चौकशी सुरू केलेली आहे. या प्रकरणात दहशतवादाचा कोणताही पुरावा नसल्याचे आढळून आलेले नाही. कौटुंबिक वादाबाबत चौकशी सुरू असली तरी निष्कर्ष काढणे अद्याप घाईचे ठरेल.

## वाकोल्याच्या स्कायवॉकवर काळोख पादचाऱ्यांना मोबाईल दिव्यांचा आधार

■ मुंबई

**वाकोल्याच्या** स्कायवॉकवर अनेक जागी काळोख असल्याने यावरून ये-जा करणाऱ्या पादचाऱ्यांना उजेडासाठी आपल्या मोबाईलमधील दिव्याचा वापर करावा लागत आहे. हा प्रकार म्हणजे पालिकेच्या दिव्याखाली अंधार अशी टीका होत आहे.

महापालिकेने लाखो रुपये खर्चून वाकोला हनुमान मंदिर ते हायवे सिग्नलपर्यंत जोडणारा स्कायवॉक बांधून तो गेल्या महिन्यात खुला केला आहे. यावर असलेले काही दिवे रात्रीच्या वेळी अंधूक पेटू लागले आहेत. इतकेच नव्हे तर दुतर्फा जिन्यांवर संपूर्ण अंधार पसरलेला असतो. तर स्काय वॉकचा काही भाग काळोखात बुडाल्याने अशा जागी पादचाऱ्यांना उजेडासाठी मोबाईलमधील दिव्यांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे रात्रीच्यावेळी पादचाऱ्यांची सुरक्षा ऐरणीवर आल्याचे चित्र आहे.



छत्रपती शिवाजी महाराज यांची वाघनखे महाराष्ट्रात दाखल झाल्यानंतर आता मराठा सरदार रघुजी भोसले यांची तलवार लंडनहून मुंबईत दाखल झाली. महाराष्ट्र सरकारने ती लिलावात विकत घेतली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या ऐतिहासिक तलवारीचा लोकार्पण सोहळा पु. ल. देशपांडे अकादमीत पार पडला.

## संतसेना महाराजांची पुण्यतिथी मालवणातील सलून उद्या बंद

मालवण- **श्री** संतसेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त मालवण तालुका नाभीक संघटनेच्या वतीने २० ऑगस्टला भैरवी मंदिर संतसेना मार्ग, भरड मालवण येथे विविध कार्यक्रम होणार आहे. यादिवशी मालवणातील सर्व सलून दुकाने पूर्ण वेळ बंद राहणार आहेत. यादिवशी सकाळी ९ वाजता संतसेना महाराज प्रतिमेचे पूजन, आरती आणि तीर्थप्रसाद, कीर्तन, दुपारी १२ वाजता गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा, स्नेहभोजन, बालगोपाळ मंडळ आचरा यांचे भजन, रात्री ८ वाजता बुवांचे भजन होणार आहे.

## अजित पवार मला टॉर्चर करत आहेत! राम शिंदेंचा आरोप

■ पुणे

**राज्याचे** उपमुख्यमंत्री अजित पवार मला मानसिक टॉर्चर करत असल्याचा आरोप भाजपा नेते आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी केला. बारामती दौऱ्यावर असताना दहीहंडीच्या कार्यक्रमादरम्यान पत्रकारांशी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले. या वक्तव्यामुळे महायुतीतील संघर्ष पुन्हा डोके वर काढत असल्याचे म्हटले आहे.

विधान परिषद सभापती राम शिंदे म्हणाले की, अजित पवारांनी आमदार रोहित पवार यांना उद्देशून भावकीचा विचार केला नसता, तर तू आमदार झालास नसता असे वक्तव्य केले होते. हेच विधान सातत्याने करून अजित पवार मला त्रास देत आहेत. ते शिळ्या कढीला ऊत का आणत आहेत? २०२४ च्या निवडणुकीनंतर अजित पवार यांनी रोहित पवार यांना उद्देशून मी आलो असतो तर तुझे काय झाले असते? असे साताऱ्यात वक्तव्य केले होते. नंतर त्यांनी आपण असे विधान केले नसल्याचे सांगितले.

## वडाळ्यात बेस्टच्या धडकेत मायलेकाचा मृत्यू

■ मुंबई

**मुसळधार** पाऊस सुरू असताना आज दुपारी ३.१० वाजता वडाळा चर्च बस स्टॉपजवळ बेस्ट बसखाली येऊन आई आणि मुलाचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. लिओबा सेल्वेराज (३८) आणि अँथनी सेल्वेराज (८) अशी मृत व्यक्तींची नावे आहेत.

रुट नंबर ए-१७४ वरून जाणारी ही बस वीर कोतवाल उद्यान येथून भरणी नाक्याकडे १५.१० वाजता जात होती. त्याचवेळी मुसळधार पावसामुळे शाळा लवकर सुटल्यानंतर आई मुलाला घरी घेऊन जात होती. ही बस वडाळा चर्च बस स्टॉपजवळ येताच आई आणि मुलगा अचानक बसखाली आले. मुलाच्या डोक्यावरून आणि आईच्या उजवा खांदा, दोन्ही पायांच्या तळव्यावरून बसचा टायर गेला. त्यामुळे दोघेही गंभीर जखमी झाले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या पोलिसांनी मुलाला केईएम रुग्णालयात नेले. मात्र, रुग्णालयातील डॉक्टरांनी दुपारी १५.४० वाजता मुलाला दाखल करण्यापूर्वी मृत घोषित केले. बस वाहकाने महिलेला सायन रुग्णालयात दाखल केले. येथील डॉक्टरांनी दुपारी १६.२५ वाजता उपचार सुरू असताना तिला मृत घोषित केले.

## अकोल्यात पूरस्थिती जनजीवन विस्कळीत विवरासह अनेक गावांना पाण्याचा वेढा

■ अकोला

**अकोल्यातील** पातूर तालुक्यात आज झालेल्या मुसळधार पावसामुळे भीषण पूरस्थिती निर्माण झाली. तालुक्यातील आलेगाव, चोंढी, सावरगाव, गावंडगाव, चान्नी आणि विवरा यांसह अनेक गावांना पाण्याचा वेढा बसला. पूरामुळे अनेक गावकऱ्यांनी डोंगरावर स्थलांतर केले. या भागातील सोयाबीन, कापूस, मका यांसह इतर पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. गुरेढोरे आणि कुक्कुटपालनालाही मोठा फटका बसला आहे. झरंडी गावातून वाहणाऱ्या उतावळी नदीला पूर आल्याने शेतांमध्ये व घरांमध्ये पाणी शिरले. त्यामुळे गावाचा संपर्क तुटला असून नागरिकांचे मोठे नुकसान झाले. नदीकाठच्या गावांना सतत सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## राधानगरी धरणाचे ७ स्वयंचलित दरवाजे उघडले

■ ठाणे

**दाजीपूर अभयारण्य** - राधानगरी पश्चिम भागामध्ये मुसळधार पाऊस पडत असल्याने राधानगरी धरणाचे सात स्वयंचलित आज सोमवारी पहाटे चार ते सव्वाचार दरम्यान उघडले आहेत .

दाजीपूर जंगल - राधानगरी पश्चिम भागांमध्ये गेल्या चार दिवसांपासून मुसळधार पावसाने झोडपून काढले असल्याने राधानगरी धरणाचे सात स्वयंचलित दरवाजे आज सोमवारी पहाटे ३ वाजून ५४ मिनिटांनी ते ४ वाजून २० मिनिटांपर्यंत सात स्वयंचलित दरवाजे खुले झाले असून, धरण परिसरात आज सकाळी ६ पर्यंत १२५ मिलिमीटर पाऊस पडला असून, सात स्वयंचलित दरवाजातून ८५६८ क्यूसेक पाण्याचा विसर्ग होत आहे तर बीओटीमधून १५०० क्यूसेक पाण्याचा विसर्ग सुरू असून, असा एकूण १००६८ क्यूसेक पाण्याचा विसर्ग भोगावती नदीमध्ये होत आहे. त्यामुळे पडळी व पिरळ या दोन धरणांवर पाणी आल्याने वाहतूक बंद झाली आहे. तरी भोगावती नदी काठाच्या शेतकऱ्यांनी सावधगिरी बाळगावी, असे आवाहन राधानगरी जनसंपदा विभागाच्या शाखा अभियंता समीर निरुखे यांनी केले आहे. यंदाच्या पावसाळी मोसमात सर्वच्या सर्व सातही दरवाजे खुले होण्याची ही पहिलीच वेळ आहे. राधानगरी धरणापासून ते दाजीपूर अभयारण्य पर्यंत

## उत्तर प्रदेशातील १०५ शाळा बंद संजय सिंगांची याचिका फेटाळली

■ नवी दिल्ली

**उत्तर प्रदेशातील** १०५ सरकारी शाळा बंद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. या निर्णयाविरोधात आम आदमी पार्टीचे नेते संजय सिंग यांनी दाखल केलेली याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दीपांकर दत्ता व न्यायमूर्ती ए.जी. मसीह यांच्या पिठाने ही याचिका फेटाळताना म्हटले की, हे प्रकरण आधीपासूनच अलाहाबाद उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे यावरील निर्णय त्यांनीच घ्यावा. यावर संजय सिंग यांच्या बाजूने युक्तिवाद करताना कपिल सिब्बल म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला ही याचिका प्राधान्याने निकाली काढावी, असे निर्देश द्यावेत.

## वृत्तपत्र व्यावसायिक खेळाडू राजेंद्र चव्हाणांचा सन्मान

■ मुंबई

**वृत्तपत्र** व्यवसाय प्रामाणिकपणे सांभाळत खेळाच्या मैदानावरही उज्ज्वल कामगिरी करणारे राजेंद्र चव्हाण यांचा सन्मान करण्यात आला. लहानपणापासूनच त्यांनी वृत्तपत्र वितरणाची जबाबदारी खांद्यावर घेतली. या कामाबरोबरच गेली ३० वर्षे पोस्ट विभागात नोकरी करून त्यांनी समाजाशी नाळ जोडून ठेवली. जबाबदाऱ्यांसोबतच खेळाची ओढ कायम ठेवत त्यांनी राष्ट्रीय कबड्डीपटू म्हणून पराक्रम गाजवला. तसेच कबड्डी प्रशिक्षक म्हणूनही अनेक तरुणांना मार्गदर्शन केले. यानंतर त्यांनी पॉवरलिफ्टिंग या खेळातही सहभाग घेतला आणि सातत्याने पदके पटकावत आपली छाप सोडली. नुकताच त्यांनी ऑगस्ट महिन्यातील पहिल्या आठवड्यात केरळातील कोझिकोडे येथे झालेल्या राष्ट्रीय पॉवर लिफ्टिंग मास्टर चॅम्पियनशिपमध्ये तिसरा क्रमांक पटकावून मुंबईचे नाव उज्ज्वल केले.

या यशाबद्दल विधान परिषद आमदार सुनील शिंदे आणि बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाचे विश्वस्त जीवन भोसले यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

## रक्षाबंधनाच्या उत्पन्नातून थकीत भत्ता द्या! एसटी कर्मचाऱ्यांची मागणी

■ मुंबई

**एसटी** कर्मचाऱ्यांचा १ हजार कोटी रुपयांची महागाई भत्त्याच्या फरकाची रक्कम गेल्या काही वर्षांपासून थकीत आहे. रक्षाबंधन कालावधीत एसटीला विक्रमी १३७.३७ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. त्यामुळे या रकमेतील काही हिस्सा कर्मचाऱ्यांना थकीत महागाई भत्ता देण्यासाठी वापरावा, अशी मागणी एसटी कर्मचारी काँग्रेसने केली.

एसटी ही अत्यावश्यक सेवा असल्याने कर्मचारी कोणत्याही सणाला कुटुंबासोबत राहू शकत नाहीत. प्रवाशांच्या सोयीसाठी ते रात्रं-दिवस सेवा देत असतात. यावर्षी रक्षाबंधनाच्या काळात कर्मचाऱ्यांनी स्वतःचा सण कुटुंबासोबत न साजरा करता, राज्यभरातील भावा-बहिणींना सुरक्षितपणे त्यांच्या गावी पोहोचवून त्यांचा आनंद द्विगुणित केला. त्यामुळे कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या थकबाकीपैकी काही हिस्सा दिला, तर त्यांचाही आनंद वाढेल, असे एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी स्पष्ट केले.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# पावसाचे धोकादायक धुमशान

**यंदाचा** पावसाळा सुरू झाल्यापासून मुंबईत पाणी तुंबण्याचे अनेक प्रकार झाले असतील परंतु मुंबईला झोडपून काढणारा पाऊस यावर्षी पहिल्यांदाच झालेला दिसतो. खरे तर पावसाचे हे मुंबईत दरवर्षी धुमशान असते आणि विशेषतः जुलै, ऑगस्ट महिन्यामध्ये त्याचा सर्वाधिक तडाखा बसतो. पावसाचे वाढते प्रमाण हा खरे तर मुंबईसाठी अतिशय गंभीर आणि चिंतेचा विषय ठरतो. २००५ साली २६ जुलैला मुंबई जलमय झाली होती. अतिशय थोड्यावेळामध्ये शंभर मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस कोसळला आणि आतासुद्धा जवळपास तशीच परिस्थिती मुंबईच्या बाबतीत पाहायला मिळते. सलग तीन ते चार तास जर पाऊस झाला तर मुंबईची अवस्था धोक्याच्याही पलिकडे जाते. राज्याच्या किंवा देशाच्या कुठल्याही भागात जर इतका मोठा पाऊस झाला तर तिथे निदान धोक्याच्या पातळ्या इशारा देण्यासाठी तरी असतात. मुंबईत आज तशी व्यवस्था नाही. केवळ वेधशाळेकडून दिले जाणारे ऑरेंज आणि रेड अलर्टच्या भरोशावर सावधगिरीची उपाययोजना केली जाते. आतासुद्धा कोकणासह ठाणे मुंबई, रायगड या भागात रेड अलर्ट दिला गेला आणि शाळा-महाविद्यालयांना सुट्टी दिली गेली. आठवड्याच्या पहिल्याच दिवशी मुंबईतल्या चाकरमान्यांची कामावर जाण्याची लगबग नेहमीपेक्षा अधिक असते. कारण अनेकांच्या सुट्ट्या संपलेल्या असतात. पुर्ण आठवडाभरच्या कामाचे वेळापत्रकही नक्की करायचे असते. स्वाभाविकपणे सोमवारी उपनगरी गाड्यांना नेहमीपेक्षा जास्त गर्दी होते. रस्त्यावरही नेहमीपेक्षा जास्त वाहने दिसतात. रात्रभर रिपरिप पडणाऱ्या पावसाने सकाळी घेतलेले रौद्ररूप मुंबईकरांची तारांबळ उडवणारे ठरले. सकाळच्या गर्दीच्या वेळात पावसाची ही तडाखेबंद वर्दी म्हणजे मुंबईकरांची घाबरगुंडी उडवणारेदेखील असते. अशा परिस्थितीत सावधगिरीच्या कितीही उपाययोजना केल्या तरी त्या खूप काही उपयोगी पडतील असे होत नाही. म्हणूनच प्रशासनालादेखील महत्त्वाचे काम असेल किंवा आवश्यकता असेल तरच लोकांनी घराबाहेर पडावे असे आवाहन करण्याची वेळ येते. यावेळच्या पावसाने पुन्हा एकदा मुंबईच्या धोक्याच्या पातळीचाच नवा इशारा सर्वांनाच दिलेला आहे.

**नागरी सुविधांचे नातेच उरलेले नाही**

गेल्या अनेक वर्षाच्या अनुभवाप्रमाणे शहरी भागामध्ये दादर, किंग सर्कल, नायगाव, सायन या भागात तुडुंब पाणी साचले होते. तुलनेने उपनगरात पाणी साचण्याचे प्रमाण कमी असले तरी सखल भागात असलेल्या नागरी वस्तींना त्याचा काही ना काही फटका बसलेला आहे. या सगळ्या प्रकारातून आर्थिक नुकसान तर होतेच. परंतु कोणत्याहीवेळी कोणत्याही प्रकारची मनुष्यहानी होण्याचीदेखील खूप मोठी शक्यता असते. मुंबईची दाटीवाटीची लोकवस्ती आणि लोकसंख्येत पडलेली प्रचंड भर याचे आणि नागरी सोयीसुविधांचे कोणतेही नाते उरलेले नाही. स्वतःची जोखीम स्वीकारूनच मुंबईत राहाण्याची वेळ आलेली आहे. काही तासासाठी का असेना परंतु संपूर्ण मुंबईचे जनजीवन ठप्प करण्याचा चमत्कार हा पाऊस करून जातो. घड्याळाच्या काट्यावर फिरणारी मुंबई असे नेहमी तिचे कौतुक केले जाते. परंतु गेल्या काही वर्षात पावसाने असे काही उच्चांक निर्माण केले आहेत की, मुंबई नावाच्या घड्याळातच पाणी शिरते आणि सगळे काटे बंद पडतात. मुंबईकर पुन्हा त्याच ऊर्जेने कामाला लागतात. कारण त्यांच्या जगण्याची सगळी समिकरणे या धावपळीत आणि धकाधकीतच दडलेली असतात. याचा अर्थ मुंबईकरांना या समस्यांची सवय झालेली आहे, असा अत्यंत सोयिस्कर समज सरकारने करून घेतलेला आहे. परंतु मुंबईच्या जनजीवनाचे व्यवस्थापन सरकारच्या नियंत्रणाबाहेर गेल्याचे हे लक्षण ठरते. केवळ मेट्रो रेल्वे किंवा सागरी महामार्ग काही दोन पाच उड्डाणपुले बांधली म्हणजे मुंबईकरांचे जनजीवन सुसह्य होईल अशीदेखील राज्यकर्त्यांची भ्रामक कल्पना आहे. कारण दोन-चार तास जो काही पाऊस कोसळतो तो या सगळ्या नागरी सोयीसुविधांचे वस्त्रहरण करणारा असतो. कारण लोकसंख्येच्या तुलनेत अपुरा पडणारा भूभाग आणि सोयीसुविधांनाही जागा उरलेली नाही. अशावेळी सरकारचे सगळे दावे उघडे पडतात. विशेषतः पावसाळ्यातच या आंतरराष्ट्रीय महानगरीची जेवढी ही दुर्दशा व्हायची ती होऊन जाते. परंतु ज्या पद्धतीने मुंबईत पाणी साचण्याचे प्रमाण वाढते आहे आणि अगदी पर्यावरण तज्ज्ञांच्या मते समुद्राची पातळीसुद्धा पुढे सरकते आहे. या सगळ्या गोष्टी धोकादायक आणि चिंताजनक ठरतात.

**मुंबई जलमय होण्यासाठी आमंत्रण**

मुंबईवरचा हा सगळा ताण कमी करण्यासाठी मोठ्या फुशारकीने नवी मुंबई, दुसरी मुंबई, तिसरी मुंबई केली जाते आहे. परंतु तिथे मुंबईपेक्षाही वेगाने लोकसंख्या वाढते आहे. नवी मुंबई अस्तित्वात येऊन पन्नास वर्षेही झालेली नाहीत. त्या आधीच तिथल्या व्यवस्थांचे तीन तेरा वाजू लागलेले आहेत. पावसाळ्यात तिथेदेखील मुंबईप्रमाणेच पाणी तुंबण्याचे प्रकार घडता आणि इतर काळामध्ये वाहतुकीच्या कोंडीपासून ते अपुऱ्या पाणी पुरवठा, अस्वच्छता , रोगराई यासारखे प्रश्न उभे राहातात. कदाचित अगदी मुंबईप्रमाणेच या जुळ्या महानगरांमधले जनजीवन ठप्प जरी होत नसले तरी सामान्य माणसाच्या गैरसोयी आणि नुकसान वाढवणाऱ्याच आहेत. मुंबईतल्या या हंगामातला हा पाऊस नेहमीप्रमाणे दंगा करून गेला. तर यासंदर्भात तातडीने उपाययोजना झाल्या पाहिजेत. तर २६ जुलैसारखा धोका कोणत्याहीवेळी निर्माण होऊ शकतो. म्हणजे पुन्हा दुसऱ्यांदा मुंबई जलमय होण्याच्या घटनेला आमंत्रण देण्याचेच हे धोरण म्हणावे लागेल. यातला सकारात्मक भाग एवढाच असतो की, मुंबईच्या परिसरातही गेल्या काही वर्षात तुडुंब पाऊस पडतो. मुंबईला पाणीपुरवठा करणारे सगळे तलाव पावसाळ्यात संपण्यापूर्वीच ओसंडून वाहतात. पंधरा वर्षापूर्वी मुंबईला जानेवारी महिन्यापासूनच पाणी कपातीला तोंड द्यावे लागायचे. आज ती वेळ राहिलेली नाही. उलट तलावांमध्ये असलेले हे भरपूर पाणी मुंबईत आणण्याचीच महापालिकेने योजना करण्याची गरज आहे.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

**प्रत्येक चांगल्या, वेगळ्या विचारांची प्रथम चेष्टा होते, मग त्याला विरोध होतो आणि शेवटी त्याच विचारांचा स्वीकार होतो.**

## पंचांग

**मंगळवार, १९ ऑगस्ट २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
**श्रावण कृष्ण एकादशी**
**नक्षत्र : आर्द्रा**

रवी उदय- ०६-२२
रवी अस्त- १९-०२



-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० मिथुन

**अजा एकादशी; मंगळागौरी व्रत; नारायण महाराज पुण्यतिथी-नेर**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता १) दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८. २) एलिगंट ऑफसेट प्रिंटर्स प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं.एफ ७-१ आणि एफ ७-२/२, एमआयडीसी, शिरोली इंडस्ट्रीयल एरीया, शिरोली गाव, ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर - ४१६१२२ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at 1) Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. . 2) Elegant Offset Pvt. Ltd., Address : Plot No.F7-1 & F7-2/2, M.I.D.C., Shiroli Industrial Area, Village Shiroli, Tal. Hatkanagle, Dist Kolhapur-416122. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती

### चीज कॉर्न मोमोज



★ **साहित्य** - मैदा पीठ - २ कप, मीठ - अर्धा टीस्पून, बेकिंग पावडर - अर्धा टीस्पून, किसलेले चीज - १ कप, कॉर्न कर्नल - १ कप, रेड चिली फ्लेक्स - १ टीस्पून, काळी मिरी पावडर - अर्धा टीस्पून,

★ **कृती** - सर्वप्रथम मैद्यामध्ये अर्धा चमचा मीठ, बेकिंग पावडर आणि एक चमचा तेल घालून चांगले मिक्स करावे. आता थोडे थोडे पाणी घालून घट्ट पीठ मळून घ्या. झाकण ठेवून अर्धा तास बाजूला ठेवा. आता कॉर्नचे दाणे पाण्यात ५ मिनिटे उकळा. त्यांना पाण्यातून बाहेर काढा आणि थंड होऊ द्या. आता एका भांड्यात किसलेले चीज, उकडलेले कॉर्न, फ्रेश क्रीम, रेड चिली फ्लेक्स आणि काळी मिरी पावडर घालून चांगले मिक्स करा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही त्यात बारीक चिरलेल्या भाज्या देखील घालू शकता. आता मळलेल्या पिठाचे गोळे पातळ लाटून घ्या. असे करण्याऐवजी, तुम्ही मोठी रोटी बनवू शकता आणि त्यातून लहान रोट्या कापू शकता. आता प्रत्येक रोटीच्या मध्यभागी काही भाज्यांचे मिश्रण ठेवा. कडांना पाणी लावून कडा एकत्र करून मोमोजचा आकार द्या. सर्व मोमोज त्याचप्रकारे तयार करा. १० मिनिटे वाफेवर शिजवा आणि तुमच्या आवडीच्या चटणीसोबत गरमागरम सर्व्ह करा. जर तुम्हाला ते अधिक चवदार बनवायचे असेल तर वाफवलेले मोमोज गरम तेलात सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा.



# दुरवापतीमुळे ईशान किशन दुलीप ट्रॉफीमधून बाहेर अभिमन्यूकडे पूर्व विभागाच्या संघाचे कर्णधारपद

**दुखापतीमुळे यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशन दुलीप ट्रॉफीमधून बाहेर पडला. काही आठवड्यांपूर्वी त्याला पूर्व विभागाचा कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आले होते. परंतु आता तो २८ ऑगस्टपासून बंगळुरू येथे सुरू होणाऱ्या ६ संघांच्या स्पर्धेत भाग घेणार नाही. त्याच्या जागी पूर्व विभागाच्या संघात ओडिशाचा २० वर्षीय यष्टीरक्षक-फलंदाज आशीर्वाद स्वेन याला स्थान देण्यात आले. पश्चिम बंगालचा २९ वर्षीय उजव्या हाताचा फलंदाज अभिमन्यू ईश्वरन जो पूर्वी उपकर्णधार होता, त्याला आता कर्णधार बनवण्यात आले आहे.**



■ कोलकाता

स्वेनने ओडिशासाठी ११ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ६१५ धावा केल्या, ज्यामध्ये त्याची सर्वोत्तम धावसंख्या ७७ आहे. त्याने ३ अर्धशतके झळकावली आणि यष्टीमागे ३५ बळी घेतले आहेत, ज्यात ३२ झेल आणि ३ स्टम्पिंगचा समावेश आहे. ओडिशा क्रिकेट असोसिएशनने गुरुवारी पूर्व विभागाच्या संघात स्वेनचा समावेश झाल्याची पुष्टी केली. ओडिशा क्रिकेट असोसिएशनने लिहिले की, 'ओडिशाचा यष्टीरक्षक-फलंदाज आशीर्वाद स्वेनची दुलीप ट्रॉफीसाठी पूर्व विभागाच्या संघात निवड झाली आहे. तो इशान किशनची जागा घेईल आणि संदीप पटनायकसह संघात सामील होईल.

जुलैमध्ये इशान किशनने त्याचा शेवटचा सामना २९ जून ते २ जुलै २०२५ दरम्यान नॉटिंगहॅमशायरकडून टॉन्टन येथे सोमरसेटविरुद्ध खेळला होता. ज्यामध्ये त्याने सहाव्या क्रमांकावर फलंदाजी करताना ७७ धावा केल्या होत्या. इशानने १४ मार्च २०२१ रोजी अहमदाबाद येथे इंग्लंडविरुद्ध भारतासाठी टी-२० मध्ये पदार्पण केले आणि आतापर्यंत त्याने २ कसोटी, २७ एकदिवसीय आणि ३२ टी-२० सामने खेळले आहेत.


**पूर्व विभागाचा संघ :**

अभिमन्यू ईश्वरन (कर्णधार), आशीर्वाद स्वेन (यष्टीरक्षक), संदीप पटनायक, विराट सिंग, दानिश दास, श्रीदाम पॉल, शरणदीप सिंग, कुमार कुशाग्रा, रियान पराग, उत्कर्ष सिंग, मनिषी, सूरज सिंधू जैस्वाल, मुकेश कुमार, आकाश दीप,

## आशिया कपमधून बाबरला वगळल्याबद्दल वाद सुरू

■ कराची

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने आशिया कपसाठी निवडलेल्या टी-२० संघातून वरिष्ठ फलंदाज बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांना वगळले. यावरून पाकिस्तानमध्ये वाद सुरू झाला आहे. माजी पाकिस्तानी क्रिकेट दिग्गज जावेद मियांदाद यांनी निवड प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी सांगितले की, निवडकर्त्यांना स्वतःला माहीत नाही की, ते काय करत आहेत. त्यांनी



कधी क्रिकेट खेळले आहे का? बाबर आझमसारख्या महान खेळाडूला वगळणे हे समजण्यापलीकडे आहे. क्रिकेटमध्ये चढ-उतार येणे स्वाभाविक आहे. खेळाडूला योग्य वेळी आत्मविश्वासाने कामगिरी करावी लागते.

## जर्मन सुपर फुटबॉल स्पर्धा बायर्न म्युनिकला विजेतेपद

■ बर्लिन

आक्रमकपटू लुईस डियाझने पदार्पणात साकारलेल्या गोलमुळे बलाढ्य बायर्न म्युनिक संघाने स्टुटगार्टवर २-१ अशी मात करत जर्मन सुपर फुटबॉल चषकाचे जेतेपद पटकावले. बायर्नचा अन्य गोल तारांकित आघाडीपटू हॅरी केनने नोंदवला. ''हंगामाची सुरुवात जेतेपदासह करणे आमच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. आमचा आत्मविश्वास दुणावला असून, बुंडसलिगाच्या नव्या हंगामासाठी आम्ही सज्ज आहोत,'' असे केन म्हणाला. केनचे हे कारकिर्दीतील दुसरे जेतेपद होते. मे महिन्यात बायर्नने 'बुंडसलिगा' जिंकली होती. त्या वेळी केनने पहिल्या जेतेपदाचा अनुभव घेतला होता. जर्मन सुपर चषकात केननेच बायर्नला आघाडी मिळवून दिली. त्याने १८व्या मिनिटाला हा गोल केला. यानंतर बायर्नने चेंडूवर ताबा राखला होता. तसेच त्यांनी गोलच्या काही संधीही निर्माण केल्या, पण त्यांना मध्यंतरापर्यंत केवळ एका गोलच्या आघाडीचे समाधान लाभले.

## डायमंड लीगच्या अंतिम फेरीत नीरज चोप्रा सहभागी होणार




■ नवी दिल्ली

२७ आणि २८ ऑगस्ट रोजी स्वित्झर्लंडच्या झुरिच येथे होणाऱ्या डायमंड लीगच्या अंतिम फेरीसाठी भारताचा स्टार भालाफेकपटू नीरज चोप्रा पात्र ठरला. सिलेसिया स्टेजनंतर नीरजने अंतिम टेबलमध्ये १५ गुणांसह तिसरे स्थान पटकावले. त्याने १६ ऑगस्ट रोजी पोलंडमध्ये झालेल्या सिलेसिया फेरीत भाग घेतला नव्हता.

त्याने मे महिन्यात दोहा डायमंड लीगमध्ये ९०.२३ मीटरचा कारकिर्दीतील सर्वोत्तम थ्रो फेकला आणि दुसरे स्थान पटकावले. त्यानंतर जून महिन्यात पॅरिस डायमंड लीगमध्ये नीरजने ८८.१६ मीटर थ्रो फेकून पहिले स्थान पटकावले. ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्याने सांगितले की, नीरज पूर्णपणे तंदुरुस्त आहे आणि तो डायमंड लीगच्या अंतिम फेरीत सहभागी होईल. सध्या नीरज चोप्रा चेक रिपब्लिकमध्ये सराव करत आहे. नीरज चोप्रा १५ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. या यादीत केशॉर्न वॉलकॉट (१७ गुण) पहिल्या आणि ज्युलियन वेबर (१५) दुसऱ्या स्थानावर आहेत. ब्रुसेल्स फेरीनंतर अंतिम टेबलमधील टॉप-६ खेळाडू झुरिच येथे होणाऱ्या डायमंड लीग फायनलसाठी पात्र ठरतील.

## दक्षिण आफ्रिकेचा संघ जाहीर म्फाका, ब्रेव्हिसला संधी

■ डरबन

ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेकडून आपला १७ सदस्यीय संघ जाहीर करण्यात आला. युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिस आणि वेगवान गोलंदाज क्वेना म्फाका यांना एकदिवसीय संघात स्थान देण्यात आले. या मालिकेत हे दोघेही पदार्पण करण्याची शक्यता आहे. दक्षिण आफ्रिकेचा संघ एकदिवसीय मालिकेत मालिका विजय मिळवत ऑस्ट्रेलियाचा निरोप घेण्यासाठी प्रयत्नशील असणार आहे. त्याचवेळी, एकदिवसीय संघाचे नेतृत्व टेम्बा बावुमाकडे सोपवण्यात आले आहे. त्याच वेळी, केशव महाराजने संघात पुनरागमन केले आहे. याशिवाय, अनेक लुआन-ड्रे प्रिटोरियस आणि प्रीनेलन सुब्रियन सारख्या नवीन चेहऱ्यांना देखील संघात संधी दिली गेली आहे.

**एकदिवसीय मालिकेसाठी दक्षिण आफ्रिकेचा संघ**

टेम्बा बावुमा (कर्णधार), मॅथ्यू ब्रीट्झके, कॉर्बिन बॉश, देवाल्ड ब्रेव्हिस, नांद्रे बर्गर, टोनी डी जियोर्गी, एडेन मार्कराम, क्वेना म्फाका, सेनुरन मुथुसामी, केशव महाराज, वियान मुल्डर, लुआन-ड्रे प्रिटोरियस, लुंगी एनगिडी, कागिसो रबाडा, रायन रिकेल्टन, ट्रिस्टन स्टब्स आणि प्रेनेलन सुब्रायन.

## श्रीकांत चषक विनाशुल्क शालेय कॅरम स्पर्धा ३० ऑगस्टला होणार

■ मुंबई

श्रीकांत स्पोर्ट्स क्लब व सार्वजनिक गणेशोत्सवातर्फे आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी सहकार्याने विविध जिल्ह्यातील १६ वर्षांखालील शालेय मुलामुलींसाठी श्रीकांत चषक विनाशुल्क कॅरम स्पर्धा ३० ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली. शालेय कॅरम खेळाडूंची प्रमुख स्पर्धेत उत्तम कामगिरी होण्यासाठी पालकांच्या विशेष मागणीनुसार स्पर्धात्मक खेळासह मोफत मार्गदर्शन देखील दिले जाणार आहे. चॅम्पियन कॅरम बोर्डवर ही स्पर्धा बाद पध्दतीने होईल. कांदिवली-पूर्व येथील श्रीकांत स्पोर्ट्स क्लबच्या सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये प्रतिवर्षी युवा खेळाडू व कलाकारांना प्रोत्साहन देताना विविध समाजोपयोगी उपक्रमांपैकी मोफत शालेय कॅरम स्पर्धा गतवर्षापासून अधिक लोकप्रिय ठरत आहे. म्हणूनच संस्थेतर्फे पहिल्या १६ विजेत्या-उपविजेत्यांना आकर्षक चषक व स्ट्रायकर पुरस्कार दिले जाणार असल्याची माहिती अध्यक्ष तेजस शहा व सचिव प्रणव निकुंभ यांनी दिली. या स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या संबंधित शालेय खेळाडूंनी प्रवेश अर्जासाठी अथवा अधिक माहितीसाठी संदीप आयरे किंवा अविनाश महाडिक यांच्याकडे २० ऑगस्टपर्यंत संपर्क साधावा.

## शिवनेरी रोड रेसमध्ये पंकज, आरुषी, ईशांत डिनेल, अनिकेत, देवश्री, श्लोक, आरती विजेते

■ मुंबई

दादर (पूर्व) येथील शिवनेरी सेवा मंडळाने भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या शिवनेरी रोड रेस २०२५ मध्ये पंकज महातो, आरुषी गुप्ता, ईशांत शर्मा, डिनेल अल्मेडा, अनिकेत सोनार, देवश्री पाटील, श्लोक मोंडकर, आरती यादवने अनुक्रमे १६, १४, १२, १० वर्षांखालील वयोगटात प्रथम क्रमांक मिळवून त्या त्या गटाचे विजेतेपद मिळविले. शिवनेरी सेवा मंडळाने दरवर्षी प्रमाणे लहान मुला-मुलींसाठी रोड रेसचे आयोजन करून भारतीय स्वातंत्र्य दिन



साजरा केला. १०, १२, १४ व १६ वर्षांखालील मुला-मुलींसाठी घेण्यात आलेल्या या रोड रेसमध्ये ५०० पेक्षा जास्त धावपटूंचा सहभाग लाभला. रोड रेसचे आकर्षण असणाऱ्या १६ वर्षांखालील मुलांच्या गटात पंकज महातो व मुलींच्या गटात आरुषी गुप्ता यांनी पहिला क्रमांक मिळवला. या रोड रेसच्या वेळी रवी करमरकर, फ्रँक अल्फान्सो, सुधाकर राऊळ हे क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. दादर येथील स्पिकवेल या इंग्रजी संभाषण शिकविणाऱ्या नामांकित संस्थेचे प्रमुख सचिन मांजरेकर, शिवसेना उपविभाग प्रमुख नितीन पेडणेकर यांनी या रोड रेसला आर्थिक सहाय्य केले. प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांक मिळवणाऱ्या धावपटूंना आकर्षक चषक, प्रमाणपत्र, रोख रक्कम देऊन त्यांना गौरवण्यात आले.





मुंबईच्या सायन-माटुंगा परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने वाहतुकीची कोंडी झाली. अनेक वाहने साचलेल्या पाण्यात बंद पडली. पादचाऱ्यांनाही पाण्यातून वाट करावी लागली.



मुसळधार पावसामुळे मुंबईतील मध्य रेल्वेच्या रुळावर काही ठिकाणी पाणी साचले होते. त्यामुळे लोकल सेवा ढिम्या गतीने सुरू होती.



परेल येथे मुसळधार पावसामुळे पाणी साचल्याने वृद्धांची मोठी गैरसोय झाली. त्यांना इतरांच्या मदतीने रस्ता पार करावा लागला.



कळवा येथे पावसामुळे शाळेतील मुलांना बोटीच्या सहाय्याने बाहेर काढले.

# नांदेड जिल्ह्यातील ६ गावे पाण्याखाली ! ५ जण बेपत्ता रावणगावामध्ये २२५ नागरिक पुराच्या पाण्यात अडकले

■ नांदेड

**मुखेड** तालुक्यात काल मध्यरात्री ढगफुटीसदृश पावसामुळे रावणगाव, भासवाडी, हसनाळ, भेंडेगाव, भिंगोली आणि सांगवी भादेव या सहा गावांमध्ये पुराचे घुसले. नांदेड जिल्ह्यात २०६ मिमी पाऊस पडला. भिंगोली येथील ५ नागरिक बेपत्ता झाले आहेत. एसडीआरएफ, लष्कर आणि स्थानिक प्रशासनाकडून बचावकार्य सुरू आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुखेड तालुक्यात रात्री दीड वाजताच्या सुमारास लोक साखरझोपेत असताना अचानक जोरदार पावसाला सुरुवात झाली. उदगीर धरणक्षेत्रात मुसळधार पाऊस झाल्याने लेंडी नदीला पूर आला. अलीकडेच पूर्ण झालेल्या लेंडी प्रकल्पाच्या पहिल्या



टप्प्यामुळे पूरपरिस्थिती आणखी गंभीर झाली. पुराच्या पाण्यात अनेक जनावरे दगावली. पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक घरे पूर्ण पाण्याखाली गेली आहेत. रावणगाव येथे तब्बल २२५ नागरिक पुराच्या पाण्यात अडकले होते. हसनाळमधून ८, भासवाडीमधून २० आणि भिंगोलीमधून ४० नागरिकांना बचावपथकाने सुखरूप बाहेर काढले. मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथे पुराच्या पाण्यात बुडून ५० म्हशी मृत्युमुखी पडल्या आहेत. प्रशासनाच्या अंदाजानुसार जिल्ह्यात २०० हून अधिक जनावरांचा मृत्यू झाला आहे.

मुखेडचे आमदार तुषार राठोड यांनी माहिती दिली की, काल रात्रीपासून पावसाचा जोर प्रचंड वाढल्याने एका रात्रीत पाण्याची पातळी तब्बल १८ फुटांनी वाढली. सध्या पावसाचा जोर ओसरलेला असला तरी संभाव्य धोका लक्षात घेऊन नागरिकांनी सतर्क राहावे.

राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, नांदेडच्या मुखेड येथील पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष भेट देऊन आढावा घेणार आहोत. गावांत चारी बाजूंनी पाणी घुसल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. आपत्तीग्रस्त नागरिकांच्या अन्न, पाणी व निवाऱ्याची व्यवस्था शाळा व शासकीय इमारतींमध्ये केली जाणार आहे. नागरिकांच्या मदतीसाठी स्थानिक प्रशासन अलर्ट मोडवर आहे.

# विहार तलाव ओसंडून वाहू लागला मुंबईचा पाणीसाठा ९१.१८ टक्क्यावर

■ मुंबई

**मुंबई** महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या ७ तलावांपैकी विहार तलाव आज दुपारीओसंडून वाहू लागला. यंदाच्या पावसाळ्यात बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणा-या ७ तलावांपैकी ६ तलाव आतापर्यंत भरले आहेत. मागील काही दिवसांमध्ये पाणलोट क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या दमदार पावसामुळे जलाशयांची पाणी पातळी झपाट्याने वाढत असून एकूण पाणीसाठी ९१.१८ टक्क्यांवर पोहोचला आहे.

# गिरगावात बुधवारी इमारतींच्या पुनर्विकासाबाबत मार्गदर्शन शिबीर

■ मुंबई

**धोकादायक** इमारतींच्या पुनर्विकासासह रहिवासी आणि भाडेकरूंना परिस्थितीची जाणीव करून देण्यासाठी मुंबई ग्राहक पंचायतीच्या गिरगाव विभागाच्या वतीने २० ऑगस्टला सायंकाळी ५ ते ७ या वेळेत गिरगावमधील आर्यन हायस्कूलच्या दुसर्या मजल्यावर मार्गदर्शन शिबीर होणार आहे. या शिबिरात म्हाडाचे सेवानिवृत्त उपविधी सल्लागार अविनाश फाटक मार्गदर्शन करणार आहेत. यासंदर्भात उपस्थित झालेल्या प्रश्नांबाबत ते कायद्याच्या दृष्टिकोनातून माहिती देणार आहेत.

CSB Bank
Trusted Heritage Smart Future

## PUBLIC NOTICE ON AUCTION OF PLEDGED GOLD ORNAMENTS

The borrower/s in specific and interested bidders,in general, are hereby informed that on account of non-repayment of the Banks due by the borrowers as under despite the payment notice and recall/auction notice issued by the Bank, the gold ornaments pledged with the bank security by the respective borrowers for the loan availed by them will be sold in public auction on "as is where is" and "non-recourse" basis through e-auction portal https://gold.samil.in on 26th August 2025 at 10.30 AM The auction may be adjourned to any other later date at the discreation of the bank upon publication of the same in the Bank's notice board. The borrowers are hereby further inform that the gold ornaments will be disposed of by private sale if the public auction is not successful and if there is a further balance to be recovered thereafter, legal action will be initiated against the borrower/s for recovery of the balance amounts due to the bank. In case of diseased borrower, all conditions will be applicable to legal heirs

| S. No. | Account Name | Client ID | No. Of Acc. | Bal.Outstanding as on 17/08/2025 | Weight (grams) |
|---|---|---|---|---|---|
| | **CHEMBUR - MUMBAI** | | | | |
| 1 | Kasimbee Khanwilkar | 7965681 | 001 | 1,87,482.00 | 43.60 |
| 2 | Lokesh Sanjay Makwane | 8223041 | 001 | 4,13,070.00 | 92.80 |
| 3 | Sandesh Sadanand Botekar | 2661116 | 001 | 42,324.00 | 8.10 |
| 4 | Sunil Bhavanji Shah | 3398332 | 001 | 6,09,469.50 | 133.00 |
| 5 | Yogesh Ashok Bhalerao | 4691932 | 002 | 80,604.50 | 22.00 |
| | **MULUND - MUMBAI** | | | | |
| 6 | Abdul Basite Shah Alam Khan | 8164855 | 001 | 9,78,532.00 | 201.60 |
| 7 | Anil Ayappan Pillai | 7390118 | 001 | 2,70,232.00 | 74.70 |
| 8 | Arjun Kishor Kadlak | 4051752 | 001 | 86,919.50 | 22.70 |
| 9 | Asma Suleman Patel | 7084493 | 002 | 2,08,530.00 | 55.00 |
| 10 | Bharat Pyarchand Sanghavi | 3346343 | 001 | 61,821.42 | 15.40 |
| 11 | Chaitrali Siddhesh Ghag | 7811056 | 001 | 34,02,557.00 | 745.70 |
| 12 | Chandan Narayan Shinde | 7249695 | 001 | 4,67,287.00 | 88.40 |
| 13 | Deepti Sunilkumar Kanther | 7401263 | 002 | 19,66,937.50 | 425.20 |
| 14 | Geeta Mahesh Puthran | 7403687 | 001 | 23,35,186.00 | 418.70 |
| 15 | George Wilson Nadar | 7265235 | 001 | 4,32,275.00 | 114.00 |
| 16 | Haimavathy Vijayan | 3827023 | 001 | 5,06,324.50 | 102.90 |
| 17 | Harindranath E | 3405699 | 001 | 35,823.00 | 7.90 |
| 18 | Heera Narayandas Ramwani | 3968376 | 001 | 2,67,770.31 | 55.50 |
| 19 | Jayesh Chatarlal Jain | 3001074 | 003 | 12,97,182.20 | 348.80 |
| 20 | Kishor Maruti Padvekar | 7067273 | 001 | 5,79,031.00 | 122.40 |
| 21 | Manoj Koovaparambil Gopalan | 3860482 | 003 | 5,39,648.00 | 110.50 |
| 22 | Maya Raju Wankhede | 4353730 | 001 | 4,43,401.50 | 111.70 |
| 23 | Mritunjay Arvind Gupta | 8154072 | 001 | 14,94,536.00 | 412.80 |
| 24 | Neelam Ninad Mahajan | 7355615 | 001 | 6,59,691.50 | 149.80 |
| 25 | Paras Mal | 4072017 | 002 | 19,82,522.00 | 407.30 |
| 26 | Raju Ukharda Wankhede | 4355282 | 001 | 10,23,639.00 | 206.50 |
| 27 | Renu Dinesh Gupta | 1135619 | 001 | 1,35,751.00 | 34.00 |
| 28 | Sanjay Bacharam Pawar | 4472785 | 001 | 1,01,702.75 | 20.80 |
| 29 | Soja Sunil Ottakandathil | 1139315 | 001 | 13,52,850.00 | 257.50 |
| 30 | Sunil Baliram Nalawade | 4245085 | 001 | 7,75,309.80 | 165.90 |
| 31 | Suresh Kumar | 8199592 | 001 | 1,09,760.00 | 21.90 |
| 32 | Sushila Devi | 7600318 | 001 | 15,91,376.00 | 336.50 |
| 33 | T V Preman . | 2739251 | 001 | 15,67,758.00 | 279.50 |
| 34 | Upendra Dindayal Yadav | 4713782 | 002 | 10,35,783.50 | 203.20 |
| 35 | Vinayak R Bhundere | 4548481 | 001 | 8,70,978.00 | 147.70 |
| 36 | Vishwanath Chinnaya Kotian | 2850130 | 001 | 3,11,586.00 | 74.30 |
| | **VASHI** | | | | |
| 37 | Firoz Mohammed Yusuf Qureshi | 4725267 | 001 | 1,55,715.14 | 40.00 |
| 38 | Imran Shabbir Karke | 4653570 | 001 | 82,775.17 | 17.90 |
| 39 | Kaushal Balu Ambike | 5023985 | 001 | 49,055.18 | 11.60 |
| 40 | Kushal Pralhad Sonawane | 4860483 | 001 | 42,591.50 | 8.20 |
| 41 | Mandakini Sampatraon Jadhav | 8188030 | 001 | 5,87,372.50 | 139.30 |
| 42 | Rajeshwari Kuberan | 4060441 | 003 | 21,19,253.47 | 495.50 |
| 43 | Sujatha Ravindran Panicker | 7328264 | 001 | 8,05,536.00 | 134.80 |
| 44 | Tajvinder Kaur Whala | 1148677 | 002 | 11,29,928.00 | 207.10 |
| 45 | Vaibhav Sanjay Chavan | 4666260 | 005 | 2,45,064.50 | 60.20 |
| 46 | Vijay Chhagan Medkar | 8148986 | 001 | 6,03,821.00 | 161.30 |
| | **KALYAN** | | | | |
| 47 | Amit Satyawan Waghmare | 4385693 | 001 | 3,82,128.00 | 62.60 |
| 48 | Aruna Shankar | 4064408 | 001 | 57,121.62 | 12.64 |
| 49 | Haresh Shyamlal Sharma | 4559831 | 001 | 1,22,313.00 | 24.96 |
| 50 | James Francis Fernandes | 3595535 | 001 | 2,71,569.91 | 53.45 |
| 51 | Komal Pravin Karande | 8132253 | 002 | 2,33,214.26 | 44.90 |
| 52 | Rajendra Ramnath Patankar | 4079149 | 001 | 38,058.21 | 8.34 |
| 53 | Ravindra Madhav Gaikwad | 3690193 | 001 | 79,148.00 | 15.62 |
| 54 | Rohit Suresh Shivsharan | 8208729 | 001 | 1,80,354.00 | 40.10 |
| 55 | Sagar Ramdas Dhane | 7080696 | 001 | 1,74,005.19 | 34.50 |
| 56 | Sandeep Ravikant Thore | 2993781 | 003 | 15,15,594.00 | 353.43 |
| 57 | Sanjay Manohar Jadhav | 4665985 | 001 | 1,26,083.95 | 23.00 |
| 58 | Shivani Arvind Karande | 4978827 | 001 | 53,616.88 | 10.57 |
| 59 | Sonali Laxman Gambhire | 2650912 | 001 | 65,215.00 | 12.29 |
| 60 | Tiji Jacob | 1173217 | 001 | 1,10,772.00 | 32.01 |
| 61 | Usha Prakash Nair | 1173061 | 001 | 13,07,055.00 | 352.83 |
| | **VASAI - EAST** | | | | |
| 62 | Durgadevi Ganesh Shah | 5066866 | 001 | 87,855.03 | 17.60 |
| 63 | Hitesh Dinesh Rathod | 5071437 | 001 | 1,54,403.00 | 29.80 |
| 64 | Mahesh Madanlal Yadav | 7268045 | 001 | 1,37,588.00 | 26.50 |
| 65 | Manish Shukla | 5029386 | 001 | 1,03,512.01 | 24.10 |
| 66 | Michael Alphonce Picardo | 1792568 | 001 | 4,02,370.60 | 66.90 |
| 67 | Mudisudum Perumal Nadar | 3537047 | 001 | 2,57,606.23 | 51.20 |
| 68 | Priscilla Percy Pereira | 3029860 | 001 | 1,84,145.00 | 40.00 |
| 69 | Pushpamala Francis Waghmare | 3103962 | 001 | 1,90,595.00 | 36.80 |
| 70 | Radha Santosh Rai | 3474161 | 001 | 5,21,140.00 | 93.70 |
| 71 | Rakhma Devi Vagtaram Choudhary | 8340826 | 001 | 2,38,059.00 | 51.20 |
| 72 | Shajan Joseph Padayattil | 1792885 | 001 | 74,062.00 | 37.30 |
| | **THANE** | | | | |
| 73 | Anita Ramlavat Yadav | 3030760 | 001 | 1,30,499.06 | 28.29 |
| 74 | Chandani Ripusudan Pandey | 5072266 | 001 | 1,31,769.00 | 23.72 |
| 75 | Harshil Jain | 7469892 | 003 | 3,42,707.67 | 62.28 |
| 76 | Mahaveer Dhulchand Jain | 4488637 | 001 | 16,46,650.00 | 337.36 |
| 77 | Miloni Devidas Sadhu | 7943101 | 001 | 7,23,582.00 | 122.88 |
| 78 | Ramlal Gurjar | 8251562 | 001 | 8,22,401.00 | 156.19 |
| 79 | Sampat Babulal Shrimal | 3099287 | 001 | 1,76,625.00 | 32.17 |
| 80 | Valsamma Devasia | 3116339 | 002 | 2,00,573.00 | 41.55 |
| | **VILE PARLE** | | | | |
| 81 | Murugan Mariappan Devendra | 7020724 | 001 | 2,07,873.00 | 39.30 |
| 82 | Prakash Gangaram Kadam | 4570589 | 001 | 60,669.86 | 19.70 |
| 83 | Shivshankar Subramani Devendra | 7960185 | 001 | 17,58,367.00 | 459.20 |
| 84 | Surya Raja Devendra | 7939698 | 001 | 5,98,963.00 | 104.50 |
| | **NAHUR** | | | | |
| 85 | Ashok Brijbihari Singh | 3728352 | 001 | 16,07,465.00 | 442.40 |
| 86 | Jis Simon | 4892261 | 001 | 2,08,362.00 | 49.00 |
| 87 | Sadanand Phoolchand Jaiswal | 4369416 | 001 | 1,96,477.50 | 41.43 |
| 88 | Sangita Manoj Nair | 3419669 | 001 | 7,04,781.82 | 165.90 |
| 89 | Savita Devi | 7772859 | 001 | 1,65,262.00 | 33.00 |
| | **ANDHERI WEST** | | | | |
| 90 | Amladass Chinnapan Gounder | 3701541 | 001 | 33,038.93 | 8.90 |
| 91 | Chandrika Basant Kumar Prajapati | 3406640 | 001 | 81,948.51 | 19.00 |
| 92 | Divya S Rajoria | 3277047 | 002 | 3,08,357.18 | 66.70 |
| 93 | Kannagi Durai Udaiyar | 3738951 | 001 | 1,22,254.00 | 25.40 |
| 94 | Neha Navneet Ranjankar | 3286620 | 001 | 5,01,516.00 | 130.70 |
| 95 | Roshan Iqbal Shaikh | 8239576 | 001 | 76,543.05 | 15.90 |
| 96 | Sagar Jayram Sakpal | 7328822 | 001 | 76,255.43 | 17.00 |
| 97 | Sajida Fareed | 4011014 | 001 | 1,55,373.21 | 33.00 |
| 98 | Sarathkumar Nehru Gounder | 3448017 | 001 | 1,35,014.50 | 30.00 |
| 99 | Udaiyar Rajesh Dilli | 7413699 | 001 | 5,22,615.00 | 120.00 |
| 100 | Umesh Dinkar Patil | 7118493 | 001 | 2,13,297.58 | 45.10 |
| 101 | Venkatesh S | 7279696 | 001 | 57,949.29 | 13.70 |
| | **MAHIM - WEST** | | | | |
| 102 | Gwendowlyn Rozario Fernandes | 1261402 | 001 | 4,12,815.74 | 85.80 |
| 103 | Pushpak Purushottam Hirlekar | 4892343 | 001 | 1,36,806.50 | 37.00 |
| | **BORIVLI - WEST** | | | | |
| 104 | Nisha Rohit Pakhare | 3942400 | 002 | 1,05,712.00 | 26.40 |
| 105 | Panchshila Suresh Ambali | 4341686 | 001 | 86,819.00 | 18.20 |
| 106 | Parth Hasmukh Gudhka | 8310390 | 001 | 24,78,551.00 | 478.70 |
| 107 | Piyari Khan | 3024218 | 001 | 86,800.50 | 20.59 |
| 108 | Rakesh Surajbhan Thakur | 4794531 | 002 | 3,90,893.22 | 85.80 |
| 109 | Shruti Shyam Naik | 5016489 | 001 | 50,801.00 | 9.80 |
| 110 | Vivek Kumar Rai | 3842134 | 001 | 36,208.08 | 8.20 |
| | **ANDHERI EAST** | | | | |
| 111 | Ananda Kumar P | 4746168 | 001 | 1,01,982.00 | 21.50 |
| 112 | Anita Shivaji Yevate | 4866773 | 001 | 25,510.00 | 9.00 |
| 113 | Harsharan Kaur | 7095344 | 001 | 1,25,222.26 | 32.00 |
| 114 | Krushnakant Gopal Salgaonkar | 4545855 | 002 | 3,32,015.00 | 74.00 |
| 115 | Yogendra Kumar Ramacharj Singh | 4915025 | 001 | 5,08,599.00 | 113.00 |
| | **NERUL - NAVI MUMBAI** | | | | |
| 116 | Adarsh Eknath Rajkar | 8236202 | 001 | 1,56,000.75 | 34.00 |
| 117 | Ajit Natha | 4145040 | 001 | 1,96,269.00 | 48.50 |
| 118 | Amit Kumar Pathak | 4559521 | 001 | 30,679.14 | 6.70 |
| 119 | Asha Valsan | 472759 | 002 | 7,72,668.47 | 206.00 |
| 120 | Mehraj Sayyed Shaikh | 2866016 | 001 | 73,401.00 | 18.40 |
| 121 | Monali Rupesh Mhatre | 4387664 | 001 | 4,59,875.89 | 99.30 |
| 122 | Pankaj Yadav | 4905463 | 001 | 41,793.50 | 10.00 |
| 123 | Rajesh Sanjeev Kundar | 2779669 | 001 | 1,54,086.28 | 46.60 |
| 124 | Rambhawan Patel | 4432387 | 001 | 7,01,343.07 | 145.40 |
| 125 | Rupali Xavier Augustine | 473555 | 001 | 34,177.50 | 10.50 |
| 126 | Shreya Satish | 7749931 | 001 | 2,66,119.70 | 59.90 |
| 127 | Sushmita Bhalchandra Mahatre | 7315723 | 001 | 6,20,524.98 | 118.20 |
| 128 | Vimal Amrut Patil | 4902850 | 001 | 2,04,084.50 | 50.50 |
| 129 | Vinod Kumar Nair | 4254262 | 001 | 1,47,742.00 | 28.60 |
| | **DOMBIVLI - WEST** | | | | |
| 130 | Akshay Madhukar Sodaye | 4420728 | 002 | 3,86,687.00 | 82.90 |
| 131 | Jitendrakumar R Vishwakarma | 3741052 | 002 | 1,80,077.41 | 37.00 |
| | **ULHAS NAGAR** | | | | |
| 132 | Ganesh Keshav Naidu | 4323929 | 001 | 1,16,036.50 | 29.70 |
| 133 | Jagdish Mavji Parmar | 5028438 | 001 | 1,09,232.24 | 22.70 |
| 134 | Leelamma Mathew | 3415823 | 001 | 54,755.29 | 11.90 |
| | **VIRAR** | | | | |
| 135 | Ambika Narayanan Nair | 7987290 | 001 | 28,126.00 | 6.40 |
| 136 | Anurag Kumar Mishra | 5070494 | 001 | 2,44,150.00 | 45.00 |
| 137 | Ayub Mohd | 5028656 | 001 | 1,20,614.37 | 27.20 |
| 138 | Nitin Genuba Gaikwad | 7157063 | 001 | 29,882.15 | 6.90 |
| 139 | Roshan Guru Prasad Mishra | 4435343 | 001 | 92,390.00 | 24.23 |
| 140 | Rupesh Ramchandra Gaikwad | 5016329 | 001 | 43,980.00 | 9.20 |
| | **BHAYANDER** | | | | |
| 141 | Anju Sandeep Chaudhary | 4566133 | 001 | 2,16,974.29 | 52.97 |
| 142 | Arjun Rajesh | 4716129 | 001 | 76,244.37 | 15.00 |
| 143 | Devilal Bherulal Prajapati | 8105805 | 001 | 99,882.00 | 18.87 |
| 144 | Kishor Mansukhlal Shah | 7330332 | 001 | 6,45,238.50 | 142.37 |
| 145 | Mohd Shamim Shaikh | 4576678 | 001 | 2,16,135.57 | 54.40 |
| 146 | Nijo Antony | 7598850 | 001 | 1,29,424.00 | 25.00 |
| 147 | Sachin Nandlal Maniyar | 8349718 | 001 | 5,71,128.00 | 93.88 |
| 148 | Saletmary Dande | 5030081 | 001 | 54,300.73 | 12.65 |
| 149 | Shaheen Mohammed Sabir Shaikh | 7624960 | 001 | 98,841.19 | 21.60 |
| | **BADLAPUR** | | | | |
| 150 | Manisha Vikas Singh | 4419289 | 001 | 51,179.00 | 11.90 |
| 151 | Sonali Siddharath Chavan | 7834736 | 001 | 40,332.00 | 6.69 |
| 152 | Swati Suryakant Jagdale | 4842024 | 001 | 46,961.38 | 9.24 |
| | **GHODBUNDER - ROAD** | | | | |
| 153 | Rajkumar . | 4834853 | 001 | 1,19,701.00 | 33.91 |
| | **GHATKOPAR** | | | | |
| 154 | Deviben Velji Patel | 4476225 | 002 | 21,76,403.00 | 390.37 |
| 155 | Sushant Shyam Bare | 8314907 | 002 | 1,75,962.00 | 32.90 |
| | **RAMNAGAR** | | | | |
| 156 | Megha Shrikant Khopde | 8338233 | 001 | 6,14,260.00 | 104.00 |
| | **MALAD WEST ORLEM** | | | | |
| 157 | Pranit Prakash Pujari | 5072295 | 001 | 1,07,045.00 | 22.58 |

For more details/account wise information borrowers/interested bidders may contact respective branches and for participating in the auction, please visit/login to the e-auction portal https://gold.samil.in

MAHARASHTRA
Date : 19.08.2025

Sd/-
Authorized Officer, CSB Bank

## जाहीर सूचना

(भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ, २०१६ च्या कलम १०२ अन्वये)

**कु. रेणू इंद्रा जीत रत्तन यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

याद्वारे सूचना देण्यात येते की, कॉर्पोरेट ऋणको म्हणजेच मे. रेणू वेलनेस अँण्ड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि. (सीआयएनः U7499PN2018PTC174781) यांनी दिलेल्या वैयक्तिक हमी(मीं)करिता वैयक्तिक जामिनदारांविरुद्ध आयबीसीच्या कलम ९४ अन्वये कु. रेणू इंद्रा जीत रत्तम (ठराव व्यावसायिकांमार्फत) द्वारे दाखल सी.पी. (आयबी) क्र. ४०८/एमबी/२०२५ मध्ये माननीय राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई यांनी त्यांच्या आदेश दिनांक १३.०८.२०२५ नुसार आयबीसी च्या कलम १०० नुसार कु. रेणू इंद्रा जीत रत्तन यांची दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.

त्यानुसार कु. रेणू इंद्रा जीत रत्तन यांच्या धनकोंना, याद्वारे त्यांचे दावे पुराव्यांसह दि. ०९.०९.२०२५ रोजी किंवा त्यापूर्वी ठराव व्यावसायिक यांना पत्ता ६०४, ओक बिल्डींग, महावीर कल्पवृक्ष, एचपी पेट्रोल पंपच्या मागे, घोडबंदर रोड, कासरवडवली, ठाणे - ४००६१५ येथे विहीत फॉर्म बीमध्ये किंवा renurattanpgrp@gmail.com येथे ईमेलद्वारे सादर (नोंद) करण्याची मागणी करण्यात येत आहे.

धनकोंनी त्यांचे दावे पुराव्यासह इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे किंवा व्यक्तिशः, नोंदणीकृत टपालाद्वारे किंवा स्पीड पोस्टद्वारे किंवा कुरियरद्वारे सादर (नोंद) करावे.

| | वैयक्तिक जामीनदार कु. रेणू इंद्रा जीत रत्तनचे तपशील | |
|---|---|---|
| १ | वैयक्तिक जामीनदाराचे नाव | कु. रेणू इंद्रा जीत रत्तन |
| २ | वैयक्तिक जामीनदाराचा पत्ता | सी शेल, "सी" विंग, ४०४, सेक्टर-०८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई, ४०००६७. |
| ३ | दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | १३.०८.२०२५ |
| ४ | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया बंद होण्याचा अंदाजित दिनांक | ०९.०२.२०२६ |
| ५ | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०९.०९.२०२५ |
| | **ठराव व्यावसायिकाचे तपशील** | |
| ६ | ठराव व्यावसायिक म्हणून काम करणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | कु. हेतल गौरांग कोठारी<br>आयबीबीआय नोंद. क्र.:<br>IBBI/IPA-001/IP-P01610/2019-2020/12500<br>एएफए क्र.: AA1/12500/02/300626/108365<br>एएफए वैधताः ३०.०६.२०२६ पर्यंत |
| ७ | मंडळाकडे नोंदणी केल्यानुसार ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ई-मेल | पत्ताः ६०४, ओक बिल्डींग, महावीर कल्पवृक्ष, एचपी पेट्रोल पंपच्या मागे, घोडबंदर रोड, कासारवडवली, ठाणे - ४००६१५.<br>ईमेल आयडीः iphetalkothari@gmail.com<br>प्रक्रिया आयडीः renurattanpgrp@gmail.com |
| ८ | दावा अर्जाकरिता यूआरएल | https://ibbi.gov.in/home/downloads |

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६च्या तरतुदी किंवा इतर कोणत्याही लागू कायद्यानुसार चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.

दिनांकः १९.०८.२०२५
ठिकाणः मुंबई

सही/-
कु. हेतल गौरांग कोठारी
ठराव व्यावसायिक
आयबीबीआय नोंदणी क्रमांकः IBBI/IPA-001/IP-P01610/2019-2020/12500
एएफए क्र.: AA1/12500/02/300626/108365 वैधताः ३०.०६.२०२६ पर्यंत

## फॉर्म सी

(नियम ९ (१) पहा)

जाहीर सूचना

(नादारी आणि दिवाळखोरी (कॉर्पोरेट कर्जदारांना वैयक्तिक जामीनदारांसाठी दिवाळखोरी प्रक्रियेसाठी निर्णय प्राधिकरणाकडे अर्ज) नियम, २०१९ च्या नियम ९(१) अंतर्गत)

**दिवाण हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड (डीएचएफएल) चे वैयक्तिक जामीनदार श्री. कपिल वाधवन यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

येथे सूचना देण्यात येत आहे की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठाने संहितेच्या कलम ६० अंतर्गत आदेश क्र.सी.पी.क्र.(आयबी) ७५५/एमबी/सी-१११/२०२५ द्वारे **१४ ऑगस्ट २०२५** रोजी **वाधवान हाऊस, प्लॉट क्र.३२/ए, युनियन पार्क रोड क्र. ५, वांद्रे (पश्चिम)** येथे राहणाऱ्या **श्री. कपिल वाधवान** यांच्याविरुद्ध दिवाळखोरी प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिले आहेत **(आदेश १६ ऑगस्ट २०२५ रोजी डाउनलोड केला गेला)**.

**श्री. कपिल वाधवान** यांच्या धनकोंना **२६ ऑगस्ट २०२५** रोजी किंवा त्यापूर्वी त्यांचे दावे पुराव्यांसह दिवाळखोरी विश्वस्त **श्री. संजय कुमार मिश्रा** यांच्याकडे **३०४, द समिट, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, विले पार्ले (पूर्व), मुंबई-५७** येथे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. धनकोंचे दावे सादर करण्याची अंतिम तारीख **२६ ऑगस्ट २०२५** असेल. धनको त्यांचे दावे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून किंवा हाताने किंवा नोंदणीकृत पोस्ट किंवा स्पीड पोस्ट किंवा कुरिअरद्वारे सादर करू शकतात.

दिवाळखोरी विश्वस्ताची अतिरिक्त माहिती:

संजय कुमार मिश्रा
IBBI/IPA-001/IP-P01047/2017-2018/11730
एएफए: एए१/११७३०/०२/३११२२५/१०७७३४
३०४, द समिट, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
विले पार्ले (पूर्व), मुंबई-५७.
btrustee.kapil@gmail.com
९३२२७५४०६८

**टीप:** खोटे किंवा दिशाभूल करणारे दावे पुराव्यांसह सादर केल्यास नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ आणि इतर कोणत्याही लागू कायद्यांच्या तरतुदींनुसार दंड किंवा तुरुंगवास होऊ शकतो.

**१९ ऑगस्ट २०२५, मुंबई**

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

पाणी पुरवठा यांत्रिकी विभाग

ई-निविदा सुचना क्र. ०८/२०२५-२६

नाशिक महानगरपालिका पाणी पुरवठा यांत्रिकी विभागाकडून ई निविदा मागविणेत येत आहे. ई निविदा सूचना क्र. ८/२०२५-२६ चे सविस्तर तपशील दिनांक २०/०८/२०२५ पासून महाराष्ट्र शासनाचे वेबसाईट **www.mahatenders.gov.in** यावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क/जा.क्र/२१३/२०२५/दि.१८/०८/२०२५

सही/-
अधीक्षक अभियंता (यां)
नाशिक महानगरपालिका नाशिक

झाडे लावा, झाडे जगवा

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

विभागाचे नाव:- माहिती व तंत्रज्ञान विभाग

निविदा सुचना क्र. ०५ (२०२५-२६)

**कामाचे नाव:-** नाशिक महानगरपालिकेतील विविध विभागांकरीता संगणकीय साहीत्य पुरविणेबाबत.

**कामाचे प्राकलन र.रु-** ०१,०४,२०,०८०/-

इच्छुक निविदा धारकांनी सविस्तर माहिती साठी https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर भेट दयावी.

**टिप-** यापुढील सर्व आवश्यक सुचना / शुध्दीपत्रक हे Online website वर प्रसिध्द करण्यात येतील.

जनसंपर्क/जा.क्र/२१९/२०२५
दि.१८/०८/२०२५

Sd/-
उपआयुक्त
माहिती व तंत्रज्ञान विभाग,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

सर्व नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरावे.

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अंतर्गत

## ई-लिलाव सूचना - जोडपत्र

**एएमडब्ल्यू कमर्शियल व्हेईकल ॲप्लिकेशन्स लिमिटेड (परिसमापनामध्ये)**

नोंद कार्यालयः कार्यालय क्र. ७, २रा मजला, रेडीमनी टेरेस, १६७, डॉ. ए. बी. रोड, वरळी मुंबई - ४०००१८.

**"मे. एएमडब्ल्यू कमर्शियल व्हेईकल ॲप्लिकेशन्स लिमिटेड - परिसमापनामध्ये (कॉर्पोरेट ऋणको)"ची एकत्रितरित्या मालमत्तेची विक्री** करिता ई-लिलाव प्रक्रियेच्या संबंधात इच्छुक बोलीदारांकडून बोली मागविणाऱ्या, नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ आणि त्याअंतर्गत असलेल्या नियमनांअंतर्गत, सर्वसाधारण जनतेस दिलेल्या दिनांक ०५.०८.२०२५ रोजीची सूचना आणि दि. ०६.०८.२०२५ रोजीच्या जोडपत्रास जोडून सदर जोडपत्र पारित करण्यात येत आहे. विक्री बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म https://baanknet.com द्वारे करण्यात येईल.

ई-लिलाव सूचनेच्या जोडपत्रामध्ये, इसारा रक्कम अनामत (ईएमडी) सादर करण्याचा अंतिम दिनांक २० ऑगस्ट, २०२५ असा नमूद करण्यात आला आहे. तो **१४ दिवसांनी म्हणजेच दिनांक ३ सप्टेंबर, २०२५ पर्यंत वाढविण्यात आला आहे.**

तसेच, **ई-लिलाव दिनांक १४ दिवसांनी वाढविण्यात आला आहे आणि म्हणून ई-लिलाव दि. ५ सप्टेंबर, २०२५ (दुपारी १२ ते दु. २ पर्यंत)** बँकनेट लिलाव प्लॅटफॉर्म https://baanknet.com **द्वारे आयोजित करण्यात येईल.**

लिलाव प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यास इच्छुक असलेल्या संभाव्य बोलीदारांनी ईएमडी रक्कम आणि ईओआय दस्तऐवज ई-लिलाव पोर्टलद्वारे **दि. ३ सप्टेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी** जमा करावी.

सही/-
अविनाश अंबिकाप्रसाद शुक्ला, परिसमापक
एएमडब्ल्यू कमर्शियल व्हेईकल ॲप्लिकेशन्स लिमिटेड - परिसमापनामध्ये
आयबीबीआय नोंदणी क्र.: IBBI/IPA-003/IP-N00243/2019-2020/12839
एएफए प्रमाणपत्र क्र. AA3/12839/02/300626/301298 वैधता दि. ३०.०६.२०२६ पर्यंत
ईमेल आयडी (प्रक्रिया विशिष्ट): eoi.amwvehicle@gmail.com
ईमेल आयडी (आयबीबीआयकडे नोंदणीकृत): avinashshukla1708@gmail.com
दिनांक: १८.०८.२०२५
ठिकाण: मुंबई

## बृहन्मुंबई महानगरपालिका

सहाय्यक आयुक्त 'डी' विभाग यांचे कार्यालय, जोबनपुत्र कंपाऊंड, नानाचौक, ग्रँट रोड, मुंबई - ४०० ००७,

क्र. स. आ. डी. /४९४ / सहा.अभि./ घ.क.व्य./ डी दि. १४.०८.२०२५

### स्वारस्य अभिव्यक्ती

'डी' विभाग कार्यालय ईमारत येथे हाऊसकीपिंग करिता अशासकिय संस्थेची नेमणूक करण्याबाबत हे काम करण्यासाठी इच्छुक संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करून काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे. 'डी' विभागात सदर काम करणाऱ्या संस्थांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

इच्छुक संस्थांना याबाबतचा तपशील, अर्ज व इच्छापत्राच्या नमुन्यासाठी सहा. अभियंता (घकव्य) 'डी' विभाग यांच्या कार्यालयात दि. १९.०८. २०२५ ते २५.०८.२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत संपर्क साधावा.

संस्थेने 'डी' विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख दि. २५.०८.२०२५ (दु. ०१.०० वाजेपर्यंत) आहे.

सही/-
सहा. अभियंता (घकव्य) 'डी' विभाग

पीआरओ/१३२२/जाहि./२०२५-२६

शक्यतो घरी केलेले व ताजे अन्न पदार्थ खावे.

# रणबीरला कुणापासून धोका?



रणबीर कपूरसह अनेक निर्माता-दिग्दर्शक मोठ्या बजेटचे प्रोजेक्ट्स करत आहेत. सध्या तीन मोठे दिग्दर्शक त्याच्यासह काम करत आहेत; ते चित्रपट आहेत 'रामायण', 'लव्ह ण्ड वॉर' आणि 'धूम ४'. शिवाय, रणबीरला आपल्या सिनेमासाठी साइन करण्यासाठी अनेक निर्माता-दिग्दर्शक रांगेत उभे आहेत. अशातच एका ब्लॉकबस्टर चित्रपटाच्या सिक्वेलची चर्चा सुरू झाली असून रणबीर त्या सिनेमात काम करण्याची शक्यता आहे. परंतु त्याच्यासमोर १८०० कोटींचा एक स्टार अभिनेता उभा आहे , जो रणबीरला मात देऊन या सिक्वेलमध्ये काम करण्याची बाजी मारू शकतो. कोण आहे तो स्टार? सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, निर्माता - दिग्दर्शक बी. सुभाष यांनी गेली दोन वर्षे शेमारू एंटरटेनमेंटसह असलेला कायदेशीर वाद आता मिटवला आहे. शेमारू एंटरटेनमेंटने 'डिस्को डांसर'च्या सिक्वेलचा प्रस्ताव ठेवत कॉपीराइट उल्लंघन होण्याची चिंता व्यक्त केली होती. मात्र, १२ ऑगस्टला मुंबई हायकोर्टद्वारे बी. सुभाष यांच्या बाजूने निर्णय दिला आहे. त्यामुळे ज्येष्ठ अभिनेता मिथुन चक्रवर्ती अभिनित या सिनेमाचा सिक्वेल बनवला जाणार आहे. याविषयी एका इंग्रजी वृत्तपत्रासह बोलताना बी. सुभाष यांनी सांगितले की, 'डिस्को डांसर' हा सिनेमा माझ्या सृजनशीलतेशी निगडीत आहे. शेमारूसह काही व्हिडिओ आणि सॅटेलाइट राइट्ससाठी माझा एक व्यावसायिक करार झाला होता हे खरे असले तरी या चित्रपटाचे क्रिएटिव्ह राइट्स माझ्याकडेच आहेत. आता डिस्को डान्सरचा सिक्वेल बनवण्यासाठी कथेवर काम सुरू आहे. बी. सुभाष यांनी दे देखील सांगितले की, या सिक्वेलमध्ये रणबीर कपूर किंवा अल्लू अर्जुन यांच्यापैकी एका हिरोला घेण्याची त्यांची इच्छा आहे, कारण दोघेही उत्तम डान्सर आहेत. रणबीरपेक्षा अल्लू अर्जुनचा मोठा चाहतावर्ग आहे. १८०० कोटींहून अधिक कमाई केलेल्या 'पुष्पा २' मुळे अल्लू केवळ दक्षिणेतच नाही तर संपूर्ण भारतात लोकप्रिय झाला आहे. त्यामुळे रणबीरवर अल्लू अर्जुन रणबीरच्या हातातून हा सिनेमा हिसकावून घेणार का हे पहायचे.

# ती मला चांगला अभिनेता समजत नाही

अभिनेता नवाजुद्दीन सिद्दिकी गेल्या दीड दशकापासून अनेक व्यक्तिरेखांच्या माध्यमातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. असंख्य लोक त्याला हिंदी चित्रपटसृष्टीतील एक उत्कृष्ट अभिनेता मानतात. परंतु नवाजुद्दीन सिद्दीकीची मुलगी शोरा हिचे मत या लोकांपेक्षा वेगळे आहे. ती नवाजुद्दीनला मोठा अभिनेता समजत नाही. इतकेच नाही, शोराने अद्याप आपल्या वडिलांचे कितीतरी चित्रपट बघितलेले नाहीत. ही गोष्ट खुद्द नवाजुद्दीनने एका मुलाखतीमध्ये सांगितली. तो म्हणाला की, माझे माझ्या मुलीवर खूप प्रेम आहे. कधी कधी मी तिला ओरडत देखील असतो, परंतु ती माझी खूप लाडकी आहे. शोरा अगदी साधी सरळ मुलगी आहे. ती माझ्या कामावर टीका करते. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे, ती मला घाबरत नाही. तिला या गोष्टीची जराही पर्वा नाही की, तिचे वडील एक चांगला अभिनेता आहेत. ही चांगली गोष्ट आहे की, ती कायम मला जमिनीशी जोडून ठेवते, माझ्या डोक्यामध्ये हवा जाऊ देत नाही. तिने माझे फारसे चित्रपट बघितलेले नाहीत. नवाजुद्दीन सिद्दीकीची शोरा १५ वर्षांची असून दुबई येथे राहते. काही दिवसांपूर्वी नवाजुद्दीनने मुलीचा एक व्हिडिओ शेअर करत सांगितले होते की, तिने अभिनयाचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली आहे आणि अभिनय क्षेत्रात नाव कमावण्याची तिची इच्छा आहे.







# आम्हालाच का १३-१४ तास काम करावे लागते?

'मेरे डॅडी की मारुती' आणि 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' या सिनेमांची दिग्दर्शिका आशिमा छिब्बरने आपली कारकिर्द शाहरुख खानच्या चित्रपट चक दे इंडिया द्वारे सहाय्यक दिग्दर्शिका म्हणून सुरु केली होती. तिने आत्तापर्यंत काही टीव्ही शो आणि सीरिज देखील दिग्दर्शित केल्या आहेत. त्यानंतर १० वर्षांनी तिने 'मिसेस चॅटर्जी व्हर्सेस नॉर्वे' द्वारे पुनरागम केले आहे. या चित्रपटातील भूमिकेसाठी अभिनेत्री राणी मुखर्जीला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे. एका मुलाखतीमध्ये आपल्या सिनेमांसोबतच आशिमाने दीपिका पदुकोणच्या आठ तासांच्या शिफ्टवर देखील मत मांडले आहे. हे वाचकांना माहिती असेलच की, आठ तासांच्या शिफ्टमध्ये काम करण्याच्या मुद्द्यावर दिग्दर्शक संदीप रेड्डी वांगाशी वाद झाल्यामुळे दीपिकाला वांगाच्या 'स्पिरिट' या सिनेमातून बाजूला करण्यात आले होते. आता आशिमा आशिमा छिब्बरने याविषयी मत व्यक्त करत सांगितले आहे की, हो, नक्कीच आठ तासांची शिफ्ट असायला हवी. म्हणजे बँकमध्ये देखील कामाची इतकीच वेळ असते आणि शिक्षिका देखील इतकाच वेळ काम करतात. पंडितजी सुध्दा इतकीच शिफ्ट करत असतात. आशिमा पुढे म्हणाली की, मग आम्हाला का १३-१४ तास काम करावे लागते? याचा अर्थ आमचे काम सर्वात कठीण आहे आणि जी अभिनेत्री नुकतीच आई बनली आहे, तिने आपल्या लहान बाळासह अधिक वेळ घालवावा असे तुम्हाला वाटणार नाही? नव्याने आई बनलेल्या अभिनेत्रींसाठी आठ तासांची शिफ्ट योग्य आहे.

# मला या गोष्टीचा अजिबात फायदा झाला नाही




शोमॅन राज कपूर यांचा नातू आणि रिमा जैन यांचा मुलगा आदर जैनने गेल्या आठ वर्षांमध्ये फक्त दोन चित्रपटांमध्ये काम केले आहे. हे दोन्ही चित्रपट बॉक्स ऑफिसवर अयशस्वी झाले. याविषयी नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत आदरने चित्रपटसष्टीतील घराणेशाहीविषयी आपले मत व्यक्त केले. त्याने सांगितले की, लोक नेपोटिझमबद्दल बोलत असतात, पण मला या गोष्टीचा अजिबात फायदा झाला नाही. हो, हे खरं आहे की, मी राज कपूर यांचा नातू आहे आणि करीना आणि रणबीर माझी मामेभावंड आहेत. मात्र याचा अर्थ असा नाही की, मला एका वर्षात पन्नास चित्रपट मिळाले. वर्षभरात पाच चित्रपटदेखील मिळाले नाहीत. कुठल्याही ब्रँडसह माझे डीलदेखील झाले नाहीत. माझ्या अभिनय कारकिर्दीत मला खूप संघर्ष पाहायला लागले आहे. अनेक ठिकाणी मी ऑडिशन्स दिल्या, मात्र अधिकतर ठिकाणी मला रिजेक्शनला सामोरे जावे लागले. रिजेक्शन झेलणे माझ्यासाठी कठीण होते, पण मी हार मानणारा नाही. मी रोज या संघर्षासाठी स्वतःला तयार करतो आणि चांगले काम करण्याचा प्रयत्न करतो. रिजेक्शनद्वारे मी शिकायचा प्रयत्न करतो.

# श्वानप्रेमी हे बघा,



११ ऑगस्टला सुप्रीम कोर्टाने दिल्ली एनसीआरमधील दहा लाख भटक्या कुत्र्यांना पकडून शेल्टरमध्ये बंद करण्याचा आदेश दिला, आणि त्यानंतर संपूर्ण देशभर विरोधाची एक लाट सुरु झाली. शेकडो लोक सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाच्या विरोधात प्रदर्शन करण्यासाठी रस्त्यावर उतरले, आणि तिथूनच या वादाला तोंड फुटले. आता या वादामध्ये दिग्दर्शक राम गोपाल वर्मा यांनी उडी घेतली आहे. काही दिवसांपूर्वी श्वानप्रेमींच्या विरोधात एक पोस्ट शेअर केल्यानंतर आता त्यांनी डॉग लव्हर्स हे बघा असे सांगणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. त्या व्हिडिओमध्ये काही भटकी कुत्री एका लहान मुलीला चावा घेताना आणि तिच्यावर हल्ला करताना दिसत आहेत. राम गोपाल वर्मांच्या या व्हिडिओमुळे भटक्या कुत्र्यांविषयीचा वाद आणखीनच तीव्र झाला आहे. या मुद्द्यावर राम गोपाल वर्मा आक्रमक झाले असून त्यांच्यासह महानायक अमिताभ बच्चनही उभे आहेत

# 'बॉर्डर २' ला मोठा झटका?



स्टार सनी देओलचा 'जाट' हा चित्रपट यावर्षी हिट झाला आहे. सनी सध्या आपल्या येणाऱ्या चित्रपटांचे शूटिंग जलदगतीने पूर्ण करत आहे. 'रामायण;' मध्ये तो हनुमानाची भूमिका करणार आहे. १५ ऑगस्टच्या दिवशी सनीने 'बॉर्डर २' चे पोस्टर आणि प्रदर्शनाची तारीख सोशल माध्यमांद्वारे आपल्या चाहत्यांसाठी शेअर केली होती. पुढील वर्षात हा सिनेमा २२ जानेवारीला प्रदर्शित होत आहे हे कळल्यामुळे चाहते खुश झाले होते. पण थांबा... कारण 'बॉर्डर २'च्या बाबतीत आता एक मोठा ट्विस्ट निर्माण झाला आहे. 'बॉर्डर २' चे प्रदर्शन पुढे जाण्याची शक्यता आहे. आणि सनीनेच या गोष्टीचा खुलासा केला आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीमध्ये सनीने सांगितले की, अशी आशा आहे की, पुढील वर्षाच्या सुरुवातीला 'बॉर्डर २' प्रदर्शित होईल. २६ जानेवारीचे औचित्य साधत जानेवारीमध्ये हा सिनेमा प्रदर्शित करण्याची निर्मात्याची इच्छा आहे. निर्माता तारीख नक्की करत असतो. परंतु काहीही होऊ शकते. स्पेशल इफेक्ट्सपासून तब्बेत बिघडण्यापर्यंत. कुठल्याही कारणाने चित्रपटाचे प्रदर्शन पुढे जाऊ शकते. चित्रपट तयार असताना, चित्रपटाच्या पोस्ट प्रॉडक्शनवर काम सुरु असताना सनी देओलने असे का सांगावे हा खरा प्रश्न आहे. म्हणजे निर्माताच सिनेमाचे प्रदर्शन पुढे ढकलत आहे का? त्यामागे काय कारण आहे? या सिनेमामध्ये सनी देओलसह वरुण धवन, दिलजीत दोसांझ आणि अहान शेट्टी यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

# गूढपणे खेळलेला भयाचा खेळ - श्श ... घाबरायचं नाही

परीक्षण

मकरंद जोशी

मानवी प्राथमिक प्रवृत्तींमधील सर्वात मूलभूत आणि कदाचित सर्वात नकोशी भावना म्हणजे भय. मानवी संस्कृतीच्या आरंभापासून, किंवा खरंतर संस्कृती-समाज म्हणून काही रचना होण्याच्या आधीपासून, भयाचे विविध अवतार माणसाने अनुभवले आहेत. हे भय अनेकदा बाहेरच्या कुठल्या गोष्टींमधून उत्पन्न होत नाही, तर ती आपल्याच मनात प्रसवते. त्यामुळे भयाचं रोप मनात वाढतं आणि ते मनालाच खातं. असं जरी असलं तरी, ज्याप्रमाणे मराठी साहित्यात दर्जेदार भय व गूढ कथा मर्यादित प्रमाणात का होईना, पण उपलब्ध आहेत, त्यामानाने मराठी नाटक आणि सिनेमा मात्र या बाबतीत कोरडेच म्हटले पाहिजेत. खरंतर कथा-कादंबरीपेक्षा नाटक किंवा चित्रपट हे माध्यम गूढ कथानक आणि भयप्रद गोष्टी दाखवायला अधिक सोपं आणि सोईस्कर आहे. तरीही मराठी रंगभूमीवर अस्सल गूढ-भय नाट्यांची उणीवच भासते. मात्र, ही उणीव दमदारपणे दूर करणारा एक अनोखा 'प्रयोग' म्हणजे 'श्श घाबरायचं नाही'.

मराठी नाटकांना आपल्या वैविध्यपूर्ण विषयांवरील, वेगळ्या मांडणीच्या, आशयघन कथानकांच्या नाटकांनी समृद्ध करणारं नाव म्हणजे रत्नाकर मतकरी. त्यांच्या या भय-गूढ कथांमधील दोन अतिशय लोकप्रिय कथा निवडून अनुभवी नाट्य दिग्दर्शक विजय केंकरे यांनी मराठी रंगभूमीवर अभावानेच दिसणारा गूढ नाट्य प्रयोग सिद्ध केला आहे. 'श्श ... घाबरायचं नाही' या नाटकाची रचना दिग्दर्शकाने जाणीवपूर्वक वेगळी केली आहे. कथा कथन, अभिवाचन या सादरीकरणामधील बलस्थानांना नाटकाच्या सगळ्या अंगांची जोड दिल्यामुळे रंगमंचावर सादर होणारा प्रयोग अतिशय वेधक ठरतो.



यासाठी रत्नाकर मतकरी यांच्या 'पावसातला पाहुणा' आणि 'जेवणावळ' या दोन कथा निवडल्या आहेत. ही निवडच अर्धी बाजी मारून गेली आहे. 'पावसातला पाहुणा' आणि 'जेवणावळ' या दोन्ही कथा अगदी वेगळ्या प्रकारच्या वातावरणात घडतात, असून त्यांच्यात जराही साम्य नाही. नाही म्हणायला, दोन्हीकडे एका वाड्यात अचानक आलेला पाहुणा हेच काय ते साम्यस्थळ आहे. या साम्याचा वापर दिग्दर्शक विजय केंकरे आणि नेपथ्यकार नीरज शिरवईकर यांनी चालाकीने करून घेतला आहे. त्यामुळे नेपथ्यामधील जुन्या, गूढ भासणाऱ्या वाड्याचा अतिशय बोलका उपयोग दोन्ही कथांच्या सादरीकरणासाठी करून घेतलेला पाहायला मिळतो. त्याच प्रमाणे शीतल तळपदे यांच्या प्रभावी प्रकाशयोजनेमुळे सादरीकरणातील गूढाची छटा अधिक गडद होते. दुसऱ्या अंकातील होमकुंड असो किंवा पहिल्या अंकातील कालदमनच्या ऐतिहासिक कथेतील वातावरण असो, तळपदेंच्या प्रकाशयोजनेमुळे सादर होणारे प्रसंग अधिक धारदार होतात. भयनाट्य किंवा भयपटांचा प्राण म्हणजे पार्श्वसंगीत. संगीत वजा केले तर भयाची छटा निर्माणच होणार नाही. त्याप्रमाणे 'श्श घाबरायचं नाही' मध्ये अजित परब यांचे संगीत आपली भूमिका चोख बजावतं.

रत्नाकर मतकरींच्या कथांवरील या प्रयोगाची रंगावृत्ती सुशील स्वामी यांनी केली आहे. विजय केंकरे यांना ज्या प्रकारे प्रयोग दाखवायचा आहे, त्यासाठी ही रंगावृत्ती अगदी यथायोग्य आहे. एकतर मतकरींनी लिहिताना कथा म्हणून लिहिले असल्याने, कथेच्या आकारानुसार त्यात निवेदन येणं अपरिहार्य आहे. हे निवेदन पार्श्वभूमीवर न घेता, रंगमंचावर दाखवायचे असल्याने मग ते निवेदन सादर करण्यासाठी एका पात्राची योजना करणं आवश्यक होतं. दिग्दर्शक म्हणून केंकरेंनी हा निवेदक एकाच कलाकारात कायम न ठेवता, गरजेनुसार वेगवेगळ्या कलाकारांकडून ते निवेदन सादर केल्याने समोर घडणाऱ्या कथानकाचा ओघ कायम राहिला आहे. तीनच कलाकारांमध्ये सगळा खेळ मांडायचा असल्याने प्रत्येक प्रसंग, हालचाल, विरामाच्या जागा काटेकोरपणे आखून अमलात आणल्या आहेत. त्यामुळे एक अतिशय गोळीबंद प्रयोग पाहायला मिळतो. मात्र दोन्ही कथांमध्ये निवेदन करताना निवेदकाने हातात पाने ठेवायची आवश्यकता होती का? त्या ऐवजी काही दुसरा मार्ग चोखाळायला हरकत नव्हती. नाटकाच्या आरंभी आणि दुसऱ्या अंकात मिळून वापरलेल्या भा.रा. तांबे आणि विंदा करंदीकर यांच्या कविता वातावरणाची गूढता वाढवणाऱ्या, त्यांच्या निवडीबद्दल दाद द्यायलाच हवी.

डॉ. गिरिश ओक यांनी दोन्ही अंकात प्रामुख्याने निवेदन आणि व्यक्तिरेखा अशा दोन आघाड्या सांभाळल्या आहेत. निवेदक म्हणून संवाद सादर करत असतानाचा सूर आणि व्यक्तिरेखा म्हणून बोलतानाचा सूर यामध्ये फरक त्यांनी अगदी सहजपणे दाखवला आहे. पण विरामाच्या जागांमधील सूचक दृष्टीक्षेप आणि देहबोलीमुळे व्यक्तिरेखा गडद करण्याची त्यांची हातोटी प्रयोगाची परिणामकारकता वाढवते. पुष्कर श्रोत्रीने दोन्ही कथांमधला 'पाहुणा' साकार करताना दोन्ही व्यक्तिरेखांमधला फरक उत्तम प्रकारे दाखवला. पावसातला पाहुणा दार उघडायला आलेल्या निरांजनीचं रूप बघून तिच्यात गुंतणं असो किंवा जेवणावळ कथेतला पाहुणा

**मराठी नाटकांमध्ये फार क्वचित आढळणारा प्रकार म्हणजे गूढ नाट्य. फार काही भितीदायक न दाखवताही तुमच्या मनातील भितीचे पदर कसे सोडवता येतात, मोजक्या कलाकारांसह जोरदार कथानकाच्या मदतीने रंगमंचाच्या मर्यादेत गूढ आणि भितीदायक वातावरण निर्मिती कशी करता येते, याचं उदाहरण म्हणजे 'श्श ... घाबरायचं नाही' हे नाटक.**




खानावळीत जेवत असताना त्याची मटणावरची आसक्ती असो, त्या त्या व्यक्तिरेखेचा रंग त्यांनी अगदी अस्सलपणे साकारला. या सादरीकरणातली एकमेव स्त्री कलाकार डॉ. श्वेता पेंडसे यांनी दोन कथांमधल्या दोन टोकाच्या व्यक्तिरेखा अतिशय तयारीने साकार केल्या. पहिल्या अंकातली देखणी निरांजनी, तिचे विभ्रम, तिच्या अदा जितक्या मोहकपणे दाखवल्या तितक्याच प्रभावीपणे दुसऱ्या अंकातली म्हातारी खाणावळवाली, तिचं भयाण हसणं, तोंडात दात नसल्यामुळे शब्द चावून चावून बोलणं हे साकार करून त्यांनी प्रयोगातला गूढपणा अधिक भरीव केला.

तुम्हाला जर भयकथा आवडत असतील आणि तुम्ही जरी मतकरींच्या या दोन्ही कथा वाचलेल्या असतील तरीही एक जीवंत थरार अनुभवायला 'श्श... घाबरायचं नाही' जरूर बघा.

**बदाम राजा प्रॉडक्शन्स निर्मित**
**श्श.. घाबरायचं नाही**
**लेखक - रत्नाकर मतकरी**
**दिग्दर्शक - विजय केंकरे**
**कलाकार - डॉ. गिरिश ओक, पुष्कर श्रोत्री, डॉ. श्वेता पेंडसे**

# नवाकाळ शब्दकोडे-१३४७



**आडवे शब्द –**

२. गंमत, मौज ३. सुशोभित करणे ६. धनुष्याची दोरी १०. हातातला दागिना १२. मेंढपाळ १३. राक्षस १४. दुराचरण, शिंदळकी १८. निक्षून सांगणे २०. जिंकलेला २१. वाजी, घोडा २२. कढत, उष्ण २३. संकटकाळ २६. शुक्राचार्यांची अद्भुत विद्या २८. पिठले ३०. धमकी ३१. पलंग ३२. उपवन ३३. गाढव ३५. गळून गेलेला, निरुत्साही ३८. वेळू, बांबू ४०. बरोबर, साथ ४१. या वर्षी ४३. तांडा ४५. तितर पक्षी ४६. अनुचित ४७. ओंडक्यांचा कामचलाऊ सेतू ४८. जरासंधाची राजधानी ५०. सुंदर तरुणी ५२. तलाव ५३. विस्कळित ५५. आडदांड माणूस ५७. आख्यायिका ५९. कसदार ६१. मदनाची स्त्री ६३. पाश्चात्य तंतुवाद्य ६४. जपणूक ६६. कृतक, वरवरचा ६७. उपवासाला चालणारी फळभाजी ६९. सगळी ७०. भीती ७१. कोंबड्याचे आरवणे ७२. पाठवणी ७४. लहानपणी केलेले संस्कार ७६. रामाचा मुलगा ७७. घृत ७९. थालीपीठ व चकलीसाठी लागणारे मिश्र पीठ ८०. वजन करण्याचे साधन ८२. निर्विकार चेहरा ८३. गुणांची कदर करणारा ८७. ठाम, पक्का ८९. पत्त्यांचा घातक जुगार ९०. जुन्या वाड्यात धान्य साठवण्यासाठी केलेली भिंतीतली पोकळ जागा ९२. विचार, हेतू, बेत ९४. बैलाच्या मानेवरचा उंचवटा ९६. एकाग्र नजर ९७. माळ ९८. लग्गा १००. अतिथी १०२. संत ज्ञानेश्वरांचे जन्मस्थान १०४. इस्टेट, मिळकत १०५. फिरणे १०६. रोपासाठी मातीचे पात्र १०७. कागद फाडणे १०८. आस्थेने केलेली चौकशी १०९. मार्ग

**उभे शब्द –** १. महादेव २. पाठीच्या कण्यातील हाड ३. वर्ष ४. परमेश्वर ५. सवाई, वरचढ ६. हरकत, आक्षेप ७. दंश ८. कमी ९. तलम कापडप्रकार ११. ताप आल्याची भावना १२. कोथिबिरीचे बी १५. कानवला १६. घोड्याच्या पागेवरील अधिकारी, त्यावरून रूढ झालेले आडनाव १७. छाती १९. जाळ, अग्नी २३. अंबुज २४. स्नेही २५. उसळीचे एक कडधान्य २६. सहवास, साहचर्य २७. सूकर, डुक्कर २८. फुलांचा घोस, गुच्छ २९. यकृताचा आजार, कावीळ ३०. शीण ३२. बसण्याचे लाकडी आसन ३४. भीतीदायक ३६. संतान, अपत्य ३७. सुंदर स्त्री, रूपवती ३९. वेडपट ४०. निकष न लावता केलेली निवड ४२. अरण्य ४४. भटक्या, कलंदर ४७. जागरूकता ४८. शिर, डोके ४९. जमीन, भूमी ५१. वीज ५३. अतिशय जड ५४. घातक सवय ५६. शासनाने जप्त केलेले ५८. सुसाट ६०. अखंड ६२. दुःख व्यक्त करणारे गाणे ६५. प्रबंध, सोय ६७. ऐकण्याचे इंद्रिय ६८. बारा राशीतील एक ६९. मेहुणीचा नवरा ७३. किराणा दुकानदार ७४. पक्ष, कैवार ७५. ऋण ७६. चकचकीत, चमकदार ७८. घरामागचे आवार ८१. मोहरी ८२. दागिन्यांनी सजवणे ८३. खेकडा ८४. पापी लोक मेल्यावर इथे जातात ८५. उशीचे कव्हर ८६. केविलवाणा ८८. कृश, हडकुळा ९०. खास पाहुणचार ९१. दहिवर ९२. माळ, हार ९३. समतल पृष्ठभाग ९५. गुंडाळी ९६. पृष्ठभागाचा तुकडा ९७. अंत, शेवट ९९. प्रयत्नांची शर्थ, पराकाष्ठा १०१. कसब, कला १०३. शीतल १०४. प्रयाण १०५. अखेर, मावळणे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १३४६चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. मारक ३. बाडबिस्तरा ८. सबंध ११. आसक्त १२. साह्य १३. घावनघाटले १५. भाट १६. पामर १८. ताडन १९. गवा २०. फस्त करणे २२. मदतनीस २४. तार २५. कर २६. डावा २७. वाद २८. बाळ २९. शेंडेफळ ३०. हमी ३२. गलका ३५. वाया ३६. तंगडी ३८. सकल ३९. पापक्षालन ४२. पात्रता ४४. गुहा ४५. वारा ४७. झारा ४८. नुकसान ४९. राठ ५१. जम ५३. ओणवा ५५. वादंग ५७. कच ५९. रुमाली रोटी ६०. फकीर ६२. तिठा ६३. सरस ६६. नेक ६८. महिला ७०. वग ७३. रास्त ७४. पुत्र ७५. बकबक ७७अ. महा ७८. ताळ्यावर येणे ७९. पाळी ८०. चाळ ८१. लावणी ८२. रत ८३. शास्त्रीय ८५. कन्या ८७. लाजरा ८९. जगरहाटी ९३. बटीक ९५. म्हातारा ९७. खुमारी ९८. गालगुंड ९९. रोजगार १००. बखर १०२. ऱ्हास १०३. तडक १०४. इतरेजन १०५. टेकू १०६. तटवणे १०७. बर्फी

**उभे शब्द :** १. मास २. रक्तपात ३. बाह्य ४. बिघाड ५. स्तवन ६. रान ७. ताटवा ९. बंदिस्त १०. लाटणे ११. आश्रम १२. सारस १४. घागर १५. भारवाहक १७. मनीषा १८. ताकदवान २०. फरफट २१. कडा २३. दलाल २४. ताळतंत्र २५. कडे २९. शेंडी ३१. मीलन ३२. गडवा ३३. कापा ३४. शिक्षा ३७. गतानुगतिक ३८. सहारा ४०. पक्षी ४१. लक्ष्मण ४२. पारावार ४३. प्रासाद ४६. राजमा ५०. ठक ५२. मलीन ५३. ओटी ५४. वाफ ५६. डौर ५८. चपलाहार ५९. रुद्रावतार ६१. कीव ६४. सम ६५. घराणेशाही ६६. नेत्र ६७. भाक ६९. हिम ७१. गळ्यातला ताईत ७२. येरझारा ७४. पुळी ७५. बळकटी ७६. बला ७७. कवक ७९. पायजमा ८४. नीर ८६. पेटी ८८. जरा ९०. गरीब ९१. हावरट ९२. सालस ९३. बडतर्फी ९४. कळकट ९६. भंजन ९७. खुरटे ९८. गाऱ्हाणे ९९. रोज १०१. खत

# राज्यात पावसाचा धुमाकूळ! ६ जणांचा मृत्यू

पान १ वरून

कुर्ला, नालासोपारा आणि सायन येथे मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे लोकांचे हाल झाले. पाण्याचा उपसा करणारे पंप सकाळी चालले. मात्र काही तासांनंतर ते बंद पडले. यामुळे पाण्याचा निचरा होत नव्हता. त्यातच स्थिती पाहून ठाणे व मुंबईतील दुपारच्या शाळा बंद केल्या. सकाळी शाळेत गेलेल्या मुलांना पाणी भरलेल्या रस्त्यांतून घरी आणायची कसरत पालकांना करावी लागली. मुसळधार पावसाने शहरातील वाहतूक आणि जनजीवन मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले. रूळांवर पाणी साचल्याने मध्य रेल्वे साधारण १०-१५ मिनिटांनी तर हार्बर रेल्वे २० मिनिटांनी उशिराने धावत होती. कुर्ला, माटुंगा, दादर, सायन आणि अंधेरीच्या सखल भागांमध्ये पाणी साचल्यामुळे वाहतूक मंदावली होती. अंधेरी सबवेमधील वाहतूक बंद करण्यात आली. हिंदमाता, दादर परिसरात पाणी साचल्याने नागरिकांची गैरसोय झाली होती. अंधेरी पश्चिमेकडील वीरा देसाई रोडवर मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. आरेमध्ये रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली होती. रुईया महाविद्यालयासमोरील रस्ता पाण्यात गेला होता. सायन येथे साचलेल्या पाण्यात अडकलेल्या शाळेच्या बसमधून विद्यार्थ्यांना माटुंगा पोलिसांनी सुखरूप बाहेर काढले. अनेक सखल भागांत रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने वाहन चालकांना कसरत करावी लागत होती. विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेऊन महानगरपालिकेने दुपारच्या सत्रासाठी शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली. यावेळी प्रशासनाने नागरिकांना केवळ गरज असल्यास घराबाहेर पडा, असे आवाहन केले. चेंबूरमध्ये अशोकनगर परिसरात एमएमआरडीएची भिंत कोसळल्याने सात झोपड्यांचे नुकसान झाले आहे. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. याशिवाय सायन, धोबीघाट, विवेकानंद नगर, एअर इंडिया कॉलनी, अंधेरी, खार, आग्रीपाडा आदी ठिकाणी झोपडपट्टी भागांत पाणी शिरल्याने अनेकांचे संसार पाण्यात गेले. विलेपार्ले सबवे, खेरवाडी, टिळकनगर, साळापूर, मिलिंद नगर, भक्ती सुधा परिसरातील रस्ते पाण्याखाली गेले आहेत. अनेक भागांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला होता.

नवी मुंबई कृषी बाजार, परळ, कल्याण, डोंबिवलीमध्येही पावसामुळे रेल्वे सेवा उशिराने सुरू होत्या. दहीसर, टोलनाका, घोडबंदर मार्ग आणि पश्चिम द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी झाली. सकाळी नगरपालिकेने पंप चालू केले. मात्र नंतर पंप बंद पडल्याने पाण्याची समस्या अधिक वाढली.

पावसामुळे हवाई वाहतुकीवर परिणाम झाला. खराब हवामानामुळे नऊ विमानांचे लँडिंग रद्द केले तर काही विमानांना गो-अराऊंड करण्यात आले. तर एक विमान दुसऱ्या विमानतळावर वळवले. इंडिगोने एक्स पोस्टमध्ये सांगितले की, मुंबईत पावसामुळे रस्त्यांवर पाणी साचले आहे. विमानतळाकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहतूक कोंडी झाली आहे. प्रवाशांनी लवकर निघावे आणि वेबसाईट किंवा ॲपवरून फ्लाईट स्टेटस तपासण्याची विनंती केली आहे. अक्सा एअर आणि मुंबई विमानतळ प्रशासनानेही अशाच सूचना दिल्या असून, प्रवाशांनी वेळेचे योग्य नियोजन करून विमानतळावर पोहोचण्याचे आवाहन केले आहे. मुंबई, पुणे, गोवा, बंगळुरूसारख्या शहरांत जोरदार पाऊस सुरू असल्याने हवाई प्रवासात अडथळे येण्याची शक्यता असल्याचा इशारा विमान कंपन्यांनी दिला आहे.

मुंबई, ठाणे प्रमाणे रायगड जिल्ह्याला पावसाने झोडपले. रायगड जिल्ह्यातील म्हसळा तालुक्यात सर्वाधिक २१५ मिमी पाऊस झाला. त्या खालोखाल रोहा तालुक्यात १२० मिमी तर उरण तालुक्यात ५१ मिमी नोंद झाली. दापोली, दाभोळ या राज्यमार्गावर दापोली शहरात स्टेट बँकेच्या बाहेर नाल्यातील पाणी रस्त्यावर होते. जगबुडी नदीने धोका पातळी ओलांडली तर बावनदीचे पात्र दुथडी भरून वाहत होते. वांद्री उक्षी परिसरात पूरस्थिती निर्माण झाल्याने काही रस्ते पाण्याखाली गेल्याने आसपासच्या गावांचा संपर्क तुटला. कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली असून, माणगाव, रोहा व किनाऱ्यालगतच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. संपूर्ण जिल्ह्यात पुढील काही तासांचा रेड अलर्ट जाहीर केला.

हिंगोलीच्या आजगाव गावामधून जाणारे सर्व रस्ते पुरामुळे बंद झाले. सततच्या पावसामुळे धुळे तालुक्यातील आर्णी गावात रहिवासी रोहिदास पाटील यांचे घर कोसळले. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. कोल्हापूरच्या शाहुवाडीतील कासारी नदीवरील बंधारा पाण्याखाली गेल्याने संपर्क तुटला आहे. संगमेश्वर, देवरुख येथे संरक्षक भिंत कोसळल्याने दुकानांची व वस्तूंची मोठी हानी झाली.

परभणी जिल्ह्यात, मुसळधार पावसामुळे येलदरी धरणाचे दहा, लोअर दुधना धरणाचे चार दरवाजे उघडले. गोदावरी, पूर्णा व दुधना नद्यांची पूरसदृश्य स्थिती आहे.

साताऱ्याच्या पश्चिम घाटात जोरदार पावसामुळे कोयना धरणातून १२ हजार १०० क्युसेक्स पाणी सोडले. यामुळे नदीकाठच्या गावांना आणि पर्यटकांना सतर्कतेचा इशारा दिला. अकोला जिल्ह्यात मोरणा नदीला पूर आल्याने रामबोनू पुलावर पाणी साचले असून, वाहतूक बंद करण्यात आली आहे. जालन्यातील सीना नदीला पहिल्यांदाच पूर आल्याची नोंद झाली. सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यात अतिवृष्टी झाल्याने चांदोली धरणातून पाण्याचा विसर्ग केला. कोल्हापूर जिल्ह्यात घाटमाथ्यावर सततच्या पावसामुळे पंचगंगा नदीची पाणीपातळी २० फूटांवर पोहोचली आहे. राधानगरी धरणाचे ७ दरवाजे उघडल्यामुळे ते पाणी भोगावती नदीमार्गे पंचगंगेला जाऊन मिळाले.

हवामान विभागाच्या अधिकारी शुभांगी भुते यांनी सांगितले की, आज सकाळपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाचे क्षेत्र आणि त्याच्याशी संलग्न सायक्लोनिक सर्क्युलेशन यांच्या संयुक्त प्रभावामुळे कोकण आणि मुंबई भागात अतिवृष्टीचा इशारा जारी केला आहे. वेधशाळेने जारी केलेल्या रेड अलर्ट भागात मुंबई, ठाणे, रायगड, लातूरसह संपूर्ण कोकण पट्टा समाविष्ट आहे. तर पालघर आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता असल्याने नागरिकांना खबरदारीची सूचना दिली आहे. याशिवाय समुद्रकिनाऱ्यांच्या भागांसाठी मच्छीमारांना समुद्रात जाणे टाळण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागील दोन दिवसांपासून काही भागांमध्ये अतिवृष्टी होत आहे. १८ ते २१ ऑगस्टदरम्यान काही भागांमध्ये आणखी पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यामुळे १५ ते १६ जिल्ह्यांमध्ये रेड अलर्ट जारी केला आहे. कोकणातील जगबुडी, अंबा, कुंडलिका नद्या धोक्याची पातळी ओलांडण्याची शक्यता आहे. वशिष्ठी नदीमुळे चिपळूणमध्ये पूरसदृश्य स्थिती निर्माण होते. त्या संदर्भात प्रशासनाने नियोजन केले आहे. नाशिक विभागात तापी आणि हतनूर धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने विसर्ग सुरू केला. पुणे जिल्ह्यात सर्व धरणांमध्ये पाणीसाठा भरपूर आहे. मात्र सध्या कोणतेही धरण इशारा पातळीवर पोहोचलेले नाही. अलमट्टी धरणाच्या बाबतीत कर्नाटक सरकारसोबत सातत्याने संवाद साधला जात आहे. राज्यात ८०० गावांमध्ये अतिवृष्टीची स्थिती आहे. इसापूर आणि विष्णुपुरी भाग इशारा पातळीच्या जवळ असल्याने विसर्ग वाढविण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागपूर विभागातील चंद्रपूर आणि गडचिरोली भागातही ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. अमरावती विभागातील अकोल्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. येथील मूर्तिजापूर व पातूरमध्ये पावसाचा प्रचंड प्रभाव होता. चांदूर, तिवसा, मेहकर, वाशिम, उमरखेड, महागाव, जरी-जांमणी, पूसद या भागांमध्ये पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे. यामध्ये सुमारे दोन लाख हेक्टरवर शेतीचे नुकसान झाल्याची माहिती आहे.

मुंबईतील पावसाबाबत त्यांनी सांगितले की, मागील ४८ तासांत सुमारे २०० मिमी पाऊस झाला आहे. ज्यापैकी ६ ते ८ तासांत १७० मिमी पावसाची नोंद झाली. चेंबूरमध्ये सर्वाधिक १७७ मिमी पावसाची नोंद झाली. मुंबईत १४ ठिकाणी पाणी साचले होते. त्यापैकी दोन ठिकाणी वाहतूक ठप्प झाली, पण इतर ठिकाणी वाहतूक हळूहळू सुरू होती. रेल्वे सेवा पूर्णपणे बंद नव्हती तर धीम्या गतीने सुरू होती. पुढील काही तासांसाठी मुंबईसाठी रेड अलर्ट जारी केला आहे. यामुळे दुपारच्या सत्रापासून शाळांना सुट्टी देऊन मंत्रालयातील कर्मचाऱ्यांनाही लवकर निघण्याची परवानगी दिली. आज समुद्रात तीन मीटर आणि उद्या चार मीटरपर्यंत लाटा उसळण्याची शक्यता आहे. भरतीमुळे समुद्र आणि नाल्यांची पातळी सतत वाढत आहे. त्यामुळे बीएमसीने पाणी पम्पिंगची व्यवस्था केली आहे. नागरिकांनी समुद्रकिनाऱ्यांवर जाणे टाळावे. डॉप्लर आणि हवामान यंत्रणांद्वारे अलर्टचा अभ्यास करून उद्या शाळांना सुट्टी द्यायची की नाही याचा निर्णय घेतला जाईल. जेथे लोकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावे लागते, तिथे त्यांच्या निवाऱ्याची उत्तम व्यवस्था करण्याचे आदेश प्रशासनाला दिले आहेत. पावसामुळे झालेल्या अडचणींवर प्रशासन तातडीने उपाय करत आहे. मुंबईतील पावसात मेट्रो सेवा सुरळीत सुरू असल्याने ही सकारात्मक बाब आहे.

मध्य रेल्वे अधिकारी स्वप्निल नीला यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसहून कल्याण, कसारा आणि कर्जतकडे जाणाऱ्या लोकल गाड्यांचा वेग पावसामुळे मंदावला होता. अप आणि डाऊन दोन्ही मार्गांवरील गाड्या ६-७ मिनिटे उशिराने धावत आहेत. हार्बर मार्गावरील कुर्ला, चेंबूर आणि चुनाभट्टी भागात पाणी साचल्याने गाड्या १२-१५ मिनिटे उशिराने आणि ट्रान्स हार्बर मार्गावरील गाड्याही ६-७ मिनिटे उशिराने धावत होत्या. प्रशासन सतत परिस्थितीवर नजर ठेवून आहे. लोकमान्य टिळक टर्मिनससारख्या महत्त्वाच्या ठिकाणी मोठ्या क्षमतेचे पंप लावले आहेत. नागरिकांनी अत्यावश्यक काम असल्यास प्रवास करावा.






**सायन भागात पावसाचे पाणी साचल्याने शाळेच्या बसमधून परतलेल्या मुलांना घरी नेताना पालकांना अशी कसरत करावी लागली, तर काही मुलांना पोलिसांनी सुखरूप पोलीस ठाण्यामध्ये नेले.**

# निवडणूक आयोग जबाबदारी टाळत आहे!

पान १ वरून

काही मतदारसंघात यादव व मुस्लीम समाजाच्या मतदारांची नावे काढून टाकण्यात आली. त्यावरही अद्याप कार्यवाही नाही. मग आता हे प्रतिज्ञापत्रे घेऊन काय कारवाई करणार? तृणमूल काँग्रेसच्या खासदार महुआ मोईत्रा म्हणाल्या की, पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्र्यांनी डुप्लिकेट मतदान ओळखपत्राचा मुद्दा निदर्शनास आणून दिला होता. त्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. मुख्य निवडणूक आयुक्तांकडून झालेले कठपुतळी खेळाचे प्रदर्शन लज्जास्पद आहे. आयोगाविरोधात कारवाई करून सध्याची लोकसभा भंग करायला हवी.

# आसाममधील सिमेंट कंपनीला तबब्ल अर्ध्या जिल्ह्याइतकी जमीन

पान १ वरून- शकता? तुम्हाला ३ हजार बिघा म्हणजे काय हे माहीत आहे का? ही जमीन पर्यावरणदृष्ट्या महत्त्वाची असून ती अनेक दुर्मीळ प्राणी व स्थलांतरीत पक्ष्यांचे आश्रयस्थान आहे. या जागेत अनेक उष्ण पाण्याचे झरेही आहेत. घटनेच्या ६ व्या खंडानुसार या जमिनीवरील पहिला हक्क हा आदिवासींचा आहे. त्यामुळे उत्तर काचर हिल स्वायत्त स्वराज्य संस्थेने महाबल सिमेंट कंपनीला दिलेल्या जमिनीच्या नोंदी पुढील सुनावणी दरम्यान न्यायालयात सादर कराव्यात. या खटल्याची पुढील सुनावणी १ सप्टेंबर रोजी होणार आहे. स्थानिक नागरिकांनीही या जागेतून स्थलांतरीत होण्याविषयी विविध याचिका दाखल केल्या आहेत. सिमेंट कंपनीने दावा केला आहे की, ही जमीन त्यांना निविदा प्रक्रियेद्वारे ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने देण्यात आली आहे. दरम्यान स्थानिक आदिवासी पंचायतीने ही जागा न सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

# उद्योजक घाणीवाला भाजपामध्ये

**अमरावती** - अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर शहरातील उद्योजक सलीम घाणीवाला यांनी भाजपात प्रवेश केला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेसबरोबर असलेल्या घाणीवालांच्या भाजपा प्रवेशामुळे दर्यापूर काँग्रेसला धक्का बसला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार डॉ. अनिल बोंडे आदीच्या उपस्थितीत घाणीवाला यांनी आज भाजपात प्रवेश केला. दर्यापूर नगरपरिषदेच्या माजी उपाध्यक्ष जुबेदा घाणीवाला याचे ते पुत्र असून, त्यांचे वडीलही काँग्रेससोबत होते. भाजपात त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता आहे.

**TENDER NOTICE**

Sealed Item Rate tenders are invited for Civil & Structural Repairs, Waterproofing, Plumbing, Painting & Miscellaneous Work of

**BADRINATH TOWER CHSL**

Sanjeev Enclave Lane, Seven Bungalow, Andheri (W), Mumbai-61.
Tender forms are available from
**VERSATILE CONSULTING ENGINEERS**
230/250, Arun House, Ground floor, RSC - 46, Gorai-2, Borivali (West), Mumbai - 400 091.
Tel: 9920115458 / 9029869000
From - **19.08.2025 to 28.08.2025**
Time:- 11.00 a.m to 5.00 p.m
Cost of tender document Rs. 10,000/- payable by Pay Order
(Non Refundable)

**TENDER NOTICE**

Sealed item rate tenders are invited from qualified & reputed contractors who have executed similar work to quote for Repairs, Waterproofing, Painting & Plastering work on behalf of:

**DOSTI SHOPPE LINK (Dosti Acres) Premises C.S.L.**

CTS No. 354, 355, 2/35 Village Matunga, Indian Hume Pipe Compound, Antop Hill Bus Depot, S.M. Road, Wadala (E), Mumbai – 400 037.
Tender Forms can be collected from Consultant's Office from **19/08/2025** to **30/08/2025** between **10.30 am** to **5.00 pm.** (Except Holiday)

**STERLING CONSORTIUM**
An ISO 9001:2015 CERTIFIED CO.
Add: Shop No. 21, Shree Ganesh Ekta Building, Reddy Bldg. No. 2, Near Ganesh Mandir, Yashwant Nagar, Goregaon (W), Mumbai – 400 104.
Tel: 83558 68566
Tender Cost: Rs. 5,000/- in cash (Non Refundable).

SBI
**भारतीय स्टेट बँक**
कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई – ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भागाचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भागासंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्सफर एजंट मेसर्स केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, सेलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्रमांक ३१ आणि ३२, फाइनेंसियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा, हैदराबाद, तेलंगणा – ५०० ०३२ (इमेल आयडी: **einward.ris@kfintech.com**) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | | विभिन्न क्रमांक | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पासून | पर्यंत | पासून | पर्यंत |
| १ | ०१३६५७४६ | प्रशांत आर शाह | ६५० | १२९८०९ | १२९८०९ | ७४११२६१२३१ | ७४११२६१८८० |
| २ | ००८७८९६७ | गादिचेरला वेंकट रमण मूर्ति जी एस व्ही स्वराज कुमार | ८४० | ९१९६१ | ९१९६२ | ७३९५६९९३७१ | ७३९५७००२१० |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

**स्थळ:** मुंबई
**दिनांक:** १९.०८.२०२५
समभागांची संख्या: **१४९०**
स.प्रमाणपत्रांची संख्या: **३**
महाव्यवस्थापक (शेअर्स व बॉण्ड्स)

नवाकाळ

• मुंबई । मंगळवार १९ ऑगस्ट, २०२५ • पान -८

## २९ कोंबड्यांचा वाद कोर्टात! न्यायाधीशांचा अनोखा सल्ला



**हाँगकाँग-** चीनच्या सिचुआन प्रांतात एका जोडप्याचा घटस्फोट २९ कोंबड्यांमुळे अडला होता. मा आणि झांग या जोडप्याने संमतीने घटस्फोटाचा अर्ज केला होता. त्यांनी एकत्र वाढवलेल्या २९ कोंबड्यांवर समान हक्क सांगितला आणि कोणीही माघार घ्यायला तयार नव्हते. २९ ही विषम संख्या असल्याने कोंबड्यांची समान वाटणी करणे अशक्य होते. यावरून खटल्यात न्यायाधीशांनी अनोखा सल्ला दिल्याने एकच चर्चा सुरू झाली. न्यायाधीशांनी जोडप्याला सल्ला दिला की, त्यांनी २९ पैकी एक कोंबडी कापावी. दोघांनी मिळून फेअरवेल चिकन डिनर करावे. उरलेल्या २८ कोंबड्या प्रत्येकी १४-१४ अशा समान वाटून घ्याव्यात. न्यायाधीशांच्या या अनपेक्षित सल्ल्याने जोडप्यानेही सहमती दर्शवली. या निर्णयामुळे केवळ कायदेशीर अडचणच दूर झाली नाही, तर नात्याचा शेवट एका वेगळ्या आणि अविस्मरणीय पद्धतीने करण्याची संधीही त्यांना मिळाली.

गणेश आगमन २०२५



उमरखाडीचा राजा



ग्रॅण्डरोडचा महागणपती





गणेशभक्तांच्या अलोट गर्दीत वाजत-गाजत अनेक मंडळांचे गणपती बाप्पा मंडपात पोहोचले. (सर्व छाया: दीपक साळवी)

## म्हाडाच्या घरांची महागडी किंमत कमी करण्यासाठी अभ्यास समिती

■ मुंबई

**म्हाडाकडून** काढण्यात येणाऱ्या लॉटरीतील घरे महागडी असतात अशी सर्वसामान्य लोक सातत्याने ओरड करतात. त्यामुळे भविष्यात लॉटरीतील घरांच्या किमती कशा कमी राहतील यासाठी म्हाडाने वरिष्ठ व तज्ज्ञ अधिकाऱ्यांची अभ्यास समिती नेमली आहे. या समितीचा अहवाल १५ दिवसांत प्राधिकरणाला सादर केला जाणार आहे, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

या अधिकाऱ्याने सांगितले की, लॉटरीतील घरांच्या किमती निश्चित करताना म्हाडाने काही वर्षांपूर्वी एखाद्या ठिकाणी जमीन खरेदी केली असेल त्याच्या मूळ रकमेवर व्याजाची रक्कम घरांच्या विक्री किमतीत निश्चित केली जाते. ५ टक्के प्रशासकीय खर्च, बांधकाम साहित्याच्या किमतीतील दरवाढ, इन्फ्रा चार्जेस, हे सर्व लॉटरीधारकांच्या माथी मारले जाते. त्यामुळे घरांच्या किमती वाढत जाऊन त्या १५ ते २० टक्क्यांनी महागतात. त्यामुळे या खर्चांशिवाय प्रत्यक्ष घरे बांधणीच्या बांधकामाला जो खर्च होईल ती घरांची किंमत निश्चित करावी. अन्य वाढीव खर्च घरांच्या किमतीत गृहीत धरू नये. यावर काही उपाययोजना करता येईल का? यावर समिती अभ्यास करत आहे.

## उत्तराखंडमध्ये सरकारकडे मदरशांची नोंदणी अनिवार्य

मुख्यमंत्र्यांचे आदेश

■ डेहराडून

**उत्तराखंडमधील** मदरशा बोर्डाकडे नोंदणी केलेल्या किंवा न केलेल्या सर्व मदरशांना राज्याच्या शैक्षणिक मंडळाकडे नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. पुढच्या वर्षीच्या १ जुलैपर्यंत ही नोंदणी न केल्यास हे मदरसे बंद करण्यात येतील, असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री पुष्कर सिंग धामी यांनी दिले आहेत.

आदेशात म्हटले की, जे मदरसे राज्याच्या शिक्षण मंडळाकडे नोंदणीसाठी अर्ज करतील त्यांनाच केवळ राज्याच्या अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेचा दर्जा दिला जाईल. उत्तराखंड विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात राज्याचे अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था विधेयक २०२५ आणले जाणार असून, या पार्श्वभूमीवर झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. उत्तराखंड विधिमंडळाचे अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. नव्या विधेयकानुसार मुस्लिमांबरोबरच शीख, जैन, बौद्ध, ख्रिश्चन व पारशी शैक्षणिक संस्थांनाही अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांचा दर्जा देण्यात येणार आहे. या विधेयकानुसार अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना पाली व गुरुमुखी भाषेत शिक्षण देण्याची परवानगी दिली जाण्याची शक्यता आहे. या सर्व अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण महामंडळाच्या दर्जाप्रमाणे शिक्षण दिले जाते की नाही याचीही पाहणी करण्यात येणार आहे.

## गौड सारस्वत गणेशोत्सव विक्रमी ४७४ कोटींचा विमा



■ मुंबई

**मुंबईतील** सर्वात श्रीमंत गणेशोत्सव अशी ओळख असलेल्या गौड सारस्वत सेवा मंडळाच्या किंग्ज सर्कल येथील गणेशोत्सव मंडळाने यंदा विक्रमी ४७४ कोटी रुपयांचा विमा उतरवला आहे. गेल्या वर्षी या मंडळाने ४०० कोटी रुपयांचा विमा उतरवला होता.

या मंडळाच्या गणेशमूर्तीला सोने चांदीच्या दागिन्यांनी मढवले जाते. दरवर्षी त्यात भर पडत असल्यामुळे त्याचे मूल्य वाढत असल्याने त्या प्रमाणात विम्याचेही मूल्य वाढत आहे. अर्थात या विम्यासाठी मंडळ किती रुपयांचा हप्ता भरणार आहे हे मात्र उघड करण्यात आलेले नाही. हा विमा सोने चांदीचे दागिने, मंडपातील अपघात, आग, भूकंप आणि भाविकांच्या सुरक्षेचा विचार करून उतरवण्यात आला आहे. मंडळाकडे ६७ कोटी रुपयांचे दागिने असून या विम्यामध्ये ३७५ कोटी रुपये व्यक्तीगत अपघात विम्यासाठी असून, त्याद्वारे स्वयंसेवक, पुजारी, आचारी, चालक व सुरक्षा रक्षकांना विमा संरक्षण मिळणार आहे. आगीसाठी २ कोटींचा विमा असून, लोकांच्या सुरक्षेसाठी ३० कोटी रुपयांचा विमा उतरवण्यात आला आहे. ४३ कोटी रुपयांचा विमा आगीसाठी उतरवण्यात आला आहे.

## जगातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे जहाज मुंबईत

■ मुंबई

**जगातील** दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे एलपीजी वाहतूक जहाज सह्याद्री हे भारताच्या ताफ्यात दाखल झाले आहे. ८२ हजार टन क्षमतेचे हे जहाज भारतीय नौकानयन महामंडळाने (शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया - एससीआय) खरेदी केले असून, ते मुंबई बंदरात दाखल झाले आहे. आत्मनिर्भर भारत उपक्रमांतर्गत ही महत्त्वपूर्ण खरेदी करण्यात आली आहे.

भारतातील एलपीजी मागणीपैकी तब्बल ९८ टक्के आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे एलपीजी आयात



समुद्रमार्गे स्वस्तात करण्यासाठी केंद्र सरकारने ही जबाबदारी एससीआयवर सोपवली आहे. त्यानुसार कंपनीने दोन भव्य जहाजे खरेदी करण्याचा करार केला होता. त्यातील पहिले जहाज सह्याद्री आता ताफ्यात दाखल झाले असून, दुसरे जहाज शिवालिक लवकरच येणार आहे. सह्याद्री हे अत्यंत मोठे वायुवहन जहाज (व्हीएलजीएस) असून त्याची लांबी २२५ मीटर, रुंदी ३६ मीटर व खोली २२ मीटर आहे. जगातील सर्वात मोठे एलपीजी वाहतूक जहाज चीनकडे असून, त्याची क्षमता ९३ हजार टन आहे. भारतीय कंपनीच्या मालकीचे अशा क्षमतेचे हे पहिलेच जहाज असल्याने जागतिक पातळीवर ही घटना महत्त्वपूर्ण मानली जात आहे.

## आयोगाची मंत्र्यांकडे प्रतिज्ञापत्र मागण्याची हिंमत आहे का?

■ नवी दिल्ली

**विरोधी** पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणुकांत मतचोरी झाल्याचे पुरावे सादर केल्यानंतर निवडणूक आयोगाने त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र

संजय राऊतांचा पलटवार

मागण्याच्या सूचना केल्या. यावरुन उबाठा खासदार संजय राऊत यांनी मंत्र्यांकडे प्रतिज्ञापत्र मागण्याची हिंमत आहे का, असे म्हणत आयोगावर पलटवार केला.

संजय राऊत म्हणाले की, निवडणूक आयुक्त भाजपाच्या हस्तकाप्रमाणे वागत आहेत. ज्या भाजपासाठी ते वकिली करत आहेत, त्याच पक्षातील अनुराग ठाकूर आणि अन्य काही नेत्यांनीही राहुल गांधींसारखेच आरोप केले आहेत. मग आयोगाची त्यांच्याकडून प्रतिज्ञापत्र मागण्याची हिंमत आहे का? राहुल गांधींनी विचारलेल्या प्रश्नांना आयोगाने उत्तर दिलेले नाही. कोणत्या मतदारसंघात किती लाख मतांची चोरी झाली? किती डुप्लिकेट मते पडली? यावर आयोग मौन बाळगून आहे. राऊतांनी राज्य सरकारवरही टीका केली. ते म्हणाले की, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत, अनेक योजना बंद पडल्या आहेत. अशा परिस्थितीत राज्यातील प्रमुख मंत्री लंडन दौऱ्यावर गेले आहेत.



महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली.

## बंगाली स्थलांतरित परतल्यास महिन्याला ५ हजार देणार

■ कोलकाता

**पश्चिम** बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आज एक मोठी घोषणा केली. देशाच्या इतर भागात गेलेले बंगाली

ममता बॅनर्जी यांची घोषणा

स्थलांतरित राज्यात परतावे, वर्षभर किंवा काम मिळेपर्यंत दरमहा ५ हजार देईल, असे त्यांनी म्हटले.

ममता बॅनर्जी म्हणाल्या की, ज्या राज्यांमध्ये डबल इंजिन सरकार आहे, तिथे कामधंदा करणाऱ्या बंगाली भाषिक लोकांचा छळ केला जात आहे. अशा बंगाली स्थलांतरितांची संख्या सुमारे २२ लाख आहे. आम्ही या सर्व लोकांना त्यांच्या राज्यात बंगालमध्ये येण्याचे आवाहन करत आहोत. परत येणाऱ्या या स्थलांतरितांना मदत करण्यासाठी श्रमोश्री योजना सुरू केली जाईल आणि त्याअंतर्गत त्यांना आर्थिक लाभ दिला जाईल. या स्थलांतरितांना वर्षभर किंवा काम मिळेपर्यंत दरमहा ५ हजार दिले जातील. कॅबिनेटने या योजनेला मंजुरी दिली आहे.

## आठ वेळा मतदान व्हिडिओ व्हायरल

■ नवी दिल्ली

**मतदार** केवळ एकदाच मतदान करू शकतो, असा ठाम दावा निवडणूक आयोगाने काल झालेल्या पत्रकार परिषदेत केला होता. इंडिया आघाडीचे तमिळ समर्थक जयमुरुगन यांनी आयोगाच्या दाव्याला आव्हान देणारा व्हिडिओ आज पोस्ट केला आहे. ज्यामध्ये एक मतदार ईव्हीएमवर सलग आठ वेळा मतदान करताना दिसतो. संबंधित व्यक्ती ईव्हीएमवरील विविध क्रमांकाचे बटण दाबत असल्याचे स्पष्टपणे दिसते. प्रत्येक वेळी वेगवेगळ्या क्रमांकावर मतदान करून शेवटी आठ वेळा मतदान केल्याचे सांगतो. निवडणूक आयोगाकडून यावर अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. या व्हिडिओमुळे मतदान प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

## शुभांशू शुक्ला यांचा संसदेत गौरव विरोधकांचा मतचोरीवरून गोंधळ

■ नवी दिल्ली

**भारतीय** हवाई दलाचे ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्या ऐतिहासिक अंतराळ प्रवासानंतर आज संसदेत त्यांच्यावर विशेष चर्चा आयोजित केली होती. या चर्चे दरम्यान विरोधकांनी मतचोरीच्या मुद्यावरून गदारोळ केला.

शुक्ला यांनी अलीकडेच आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर यशस्वी मोहीम पार पाडली. त्यांच्या भारतात परतण्याच्या दुसऱ्याच दिवशी संसदेत त्यांचा सन्मान करण्यात आला. मात्र, मतचोरीच्या मुद्यावरून पळ काढण्यासाठीच सरकारने हा सत्कार आयोजित केला, असा आरोप करत काँग्रेसने गदारोळ केला. त्यावरून भाजपाने हा शुक्ला यांचा अपमान असल्याचा आरोप केला.

शुक्ला यांच्या सत्कार कार्यक्रमाची सुरुवात करत केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह म्हणाले की, शुभांशू शुक्ला हे कोणत्याही राजकीय पक्षाचे नाही. ते देशाचे आहेत. त्यांच्यासारख्या अंतराळवीराचा अपमान हा देशाच्या विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्राचा अपमान आहे. परंतु विरोधकांनी लोकसभेत मतदार पडताळणी आणि मतचोरीच्या मुद्यावर गोंधळ घातला. 'वोट चोर, गद्दी छोड़' अशा घोषणा देत त्यांनी कामकाजात अडथळा आणला.

या गोंधळामुळे सकाळचे कामकाज स्थगित केले आणि पुन्हा दुपारी २ वाजता सुरू झाले. परंतु तेव्हाही काँग्रेस सदस्यांनी गोंधळ सुरूच ठेवला. काँग्रेसचे राज्यसभा खासदार सय्यद नसीर हुसेन यांनी मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग प्रस्ताव आणण्याचे संकेत माध्यमांना प्रतिक्रिया देताना दिले.

## बेस्ट पतसंस्था निवडणूक ८३ टक्के विक्रमी मतदान

■ मुंबई

**बेस्ट** एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी पतसंस्थेच्या पंचवार्षिक संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी आज ८३.६९ टक्के विक्रमी मतदान झाले. ३५ मतदार केंद्रांवर मतदान झाले. एकूण १५,१२३ मतदारांपैकी १२,६५६ जणांनी आपला मतदान हक्क बजावला. मुसळधार पावसामुळे मतदानाची वेळ दीड तासाने वाढवण्यात आली होती. उद्या या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. या पतसंस्थेवर अनेक वर्षांपासून ठाकरे गटाची सत्ता असून, या पतसंस्थेच्या निवडणुकीसाठी यंदा मनसे आणि ठाकरे गटाने एकत्र उत्कर्ष पॅनेल उभे केले. या पॅनेलला टक्कर देण्यासाठी आमदार प्रसाद लाड, प्रवीण दरेकर, नितेश राणे यांनी मिळून ५ संघटनांचे सहकार समृध्दी पॅनेल उतरवले आहे. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची झाली आहे.

## लाडकी बहीणनंतर आता शिवसेनेची 'लाडकी सून'

■ ठाणे

**राज्यातील** विधानसभा निवडणुकीत महायुतीला बहुमत मिळवून देणाऱ्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेनंतर लाडकी सून या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनेची घोषणा केली असून, राज्य स्तरावर ही मोहीम राबवली जाणार असल्याचे म्हटले आहे. मात्र, या योजनेत महिलांना कुठलाही आर्थिक लाभ दिला जाणार नसून पीडित विवाहित महिलांना सुरक्षा पुरवली जाणार आहे.

ठाण्यातील कार्यक्रमामध्ये बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लाडकी सून अभियानाची घोषणा केली. याबाबत माहिती देताना ते म्हणाले की, लाडक्या सुनेसाठी महत्त्वाची घोषणा आज करत आहोत. सासर काही वाईट नसते, पण काही मोजक्या ठिकाणी अप्रिय घटना घडतात. आपली मुलगी जशी लाडकी असते, त्याचप्रमाणे सूनही लाडकी व्हावी, यासाठी शिवसेनेने एक हेल्पलाईन सुरू केली आहे. ज्या सुनांना अडचण येईल, त्यांनी न घाबरता ८८२८८९२२८८ या क्रमांकावर फोन करावा. त्यांनी दिलेली माहिती गोपनीय ठेवली जाईल. लाडकी सून अभियानामार्फत पीडित सुनेला सुरक्षा दिली जाईल.

## अहिल्यानगरमध्ये कीर्तनात मोठा वाद! संग्रामबापू भंडारे महाराज यांना धक्काबुक्की



■ अहिल्यानगर

अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरच्या घुलेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहात कीर्तनकार संग्रामबापू भंडारे महाराज यांनी हिंदू-मुस्लीम व राजकीय विषयावर भाष्य केल्याने गोंधळ उडाला. काही नागरिकांनी विरोध करताच वाद वाढला. महाराजांना धक्काबुक्की झाली तर त्यांच्या वाहनाची तोडफोड करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी ८ ते १० जणांविरोधात गुन्हा दाखल केला. आमदार अमोल खताळ यांनी या घटनेचा निषेध करत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर अप्रत्यक्ष आरोप केले.

कीर्तनात अभंगावर निरूपण करताना महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराज, अफजल खान आणि हिंदू धर्म यांचा संदर्भ देत काही विधाने केली. यावर काही प्रेक्षकांनी विरोध दर्शवत कीर्तनात राजकारण व वादग्रस्त विधान नको, अशी मागणी केली. त्यानंतर वातावरण तापले आणि काही क्षणांतच गोंधळ सुरू झाला. हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी महाराजांची बाजू घेतली. वाद वाढल्यामुळे महाराजांनी कीर्तन थांबवले आणि ते निघून जात असताना त्यांना धक्काबुक्की झाली. त्यानंतर काही अज्ञातांनी त्यांच्या वाहनावर हल्ला करत तोडफोड केली.